जगप्रसिद्ध नामांकित ब्रँडचे दर्जेदार होम अप्लायसेंस एकाच छता खाली...
• फ्रीज • ए.सी. • वॉशिंग मशिन
• एलईडी टीव्ही • होमथिएटर
• मोबाईल • होम अप्लायन्सेस
सुलभ हप्त्यावर उपलब्ध 0% फायनान्स
COMPRO Systems & Services
HDB FINANCIAL SERVICES | BAJAJ FINSERV
अंबर प्लाझा, एचडीएफसी बँके जवळ, स्टेशनरोड, अ.नगर. मो. ९३२५१०३०५०
PHILIPS | LG | Whirlpool | SONY | SAMSUNG | KENSTAR | JVC | Electrolux

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

TATA MOTORS
श्री साई ऑटो सेंटर
टाटा मोटर्स आथोराईज सर्व्हिस स्टेशन
प्लॉट नं. ३७,३८, ओम गार्डन शेजारी, ओम भुईकाटाच्या पाठीमागे, नगर-पुणे रोड, अ.नगर. संपर्क : 9767111651 / 9890111651

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहमदनगर, बुधवार दि. १७.०७.२०२४ | अंक नं. ११७ | वर्ष ६७ वे | दैनिक वर्ष ६१ वे | ANR/022/2018-2020

खरेदीवर आकर्षक गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
• फ्रेश स्टॉक • आकर्षक गिफ्ट • भरपूर व्हरायटी • भरपूर डिस्काउंट
सावेडी अ.नगर (0241) 2999299
संगमनेर (02425) 222226
नारायणगाव (02132) 242132

# शहरातील चौक व रस्त्यांमध्ये मोकाट जनावरांचा सुळसुळाट

नगर – मोकाट जनावरांच्या कळपांमुळे शहराच्या वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून वाहनचालकांचे जीव धोक्यात आले आहे. मोकाट जनावरांना पकडण्याची मोहीम महापालिकेने हाती घेणे गरजेचे आहे. शहरातील बंगाल चौकी, गंज बाजार, माळीवाडा, वाडिया पार्क, लालटाकी, झेंडीगेट, अमरधाम, गाडगीळ पटांगण भाजी बाजार, तसेच सावेडी उपनगर मधील पाइपलाइन हडको, वाणीनगर, एकवीरा चौक भाजीबाजार, यशोदानगर भाजी बाजार ग्राउंड, श्रीराम चौक, वसंत टेकडी भागातील रस्त्यांवरील पाळीव मोकाट जनावरांमुळे सामान्य माणूस मात्र त्रस्त आहे.

गेल्या अनेक दिवसांपासून पाळीव मोकाट जनावरांचा शहरात त्रास वाढला असताना महापालिकेकडे या संदर्भात नागरिकांच्या तक्रारी वाढल्या असल्या तरी कारवाई मात्र होताना दिसत नाही. शहरातील महामार्गावरील आणि वेगवेगळ्या वस्त्यांमधील रस्त्यांवर तर जणू काही ठिकाणी जनावरांचा सुळसुळाट असल्यामुळे वाहनचालकांना त्याचा त्रास सहन करावा लागतो. शहरातील विविध भागात जनावरांचा कळप नेहमीच रस्त्यांवर उभे किंवा बसलेले असतात. पावसाळ्याच्या दिवसात मोठ्या प्रमाणात मोकाट जनावरे रस्त्यांवर येण्याबाबत अनेक मतप्रवाह आहे. काहींच्या मते गोठ्यात पावसाळ्यात चिखल आणि माश्यांचा त्रास होत असल्याने ते रस्त्यांवर ठाण मांडतात. आठवडी व रस्त्यावरील भाजी बाजार, फुल बाजार परिसरात वर्षभर मोकाट जनावरांचा सुळसुळाट असतो. परंतु मनपाच्या कोंडवाडा विभागाच्या कर्मचाऱ्यांना त्यांचा बंदोबस्त करता आलेला नाही. याचे परिणाम वाहनचालकांना भोगावे लागत आहेत तसेच परिसरात अस्वच्छता ही पसरते तरी या पाळीव मोकाट पशुमालकांवर दंडात्मक तसेच भारतीय दंडसंहितेनुसार कारवाई व्हावी अशी मागणी नागरिक करत आहेत.





शहरातील रस्त्यांवर फिरत असलेले मोकाट जनावरे (छाया –महावीर पोखरणा)



## रस्त्यावरील खड्ड्यात वृक्षारोपण करून गांधीगिरी

रस्त्यावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले आहेत. सध्या पाऊस पडत असून या खड्ड्यांचा आकार मोठा झाला आहे. वाहनचालक या खड्ड्यातून कसेबसे वाट काढत आहेत. अनेक दुचाकीस्वार घसरून लहान-मोठे अपघात घडत आहेत. या रस्त्याची दुरुस्ती करण्यात यावी याचे निवेदन देण्यात आलेले आहे. परंतू अद्याप प्रशासनाने याकडे लक्ष दिले नाही म्हणून एमआयडीसी ते निंबळक रस्त्यावरील खड्ड्यात वृक्ष लागवड करून प्रशासनाचा निषेध करण्यात आला. याप्रसंगी नगर पंचायत समितीचे माजी सभापती डॉ.दिलीप पवार, उद्योजक अजय लामखडे, निंबळक शिवसेनाप्रमुख बी.डी कोतकर, ग्रामपंचायत सदस्य सोमनाथ खांदवे, विकास चव्हाण, दत्तु दिवटे, विकास घोलप, निलेश पाडळे, दशरथ घोलप, तुकाराम शेळके आदि.

SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज

आषाढी एकादशी उपवासासाठी स्पेशल
टक्कर बुधवार दि.१७ जुलै
काजु-खिसमिस पॅटीस
शाबुदाणा वडा,
कैलास उडपी
उपवासाची स्पेशल मलाई लस्सी
शिवशक्तीअर्पाटमेंट, खिस्त गल्ली, अ.नगर.
वेळ सकाळी ७ ते रात्री ९ पर्यंत

सोहळा जमला आषाढी वारीचा सण आला पंढरीचा
मेळा जमला भक्तगणांचा, ध्यास विठुमाऊलीच्या दर्शनाचा
आषाढी एकादशी
निमित्त हार्दिक शुभेच्छा...!
श्री सुविधा यात्रा कंपनी संचलित
AMAR PREM
Holidays & Multiple services

डॉ.निखिल अरुण चिल्लाळ
MBBS, TDD, DNB, EDARM
Chest Physician & Interventional Pulmonologist
CHEST CARE CLINIC
श्वसन व फुफ्फूस रोग तज्ञ
आता प्रत्येक शुक्रवारी नगरमध्ये...
* जुनाट खोकला, सर्दी, धाप
* छातीमध्ये घर घर होणे, कफ येणे
* दमा, बाल दमा
* ॲलर्जी
* शिंका येणे
* निमोनिया
* टीबी
* छातीत पाणी, पू भरणे
* खोकल्यात रक्त येणे
* प्रौढांचे लसीकरण
* फुफ्फुसांचा कॅन्सर
* प्रतिकार शक्तीचे आजार
* धुम्रपान मुक्ती
* फुफ्फुसांचे जाळीकरण
* धूर व धुळीमुळे होणारे श्वसनाचे विकार
* फुफ्फूस, अवदान व इतर अवयवांचे
* क्षयरोग (टीबी)
* घोरणे व झोपेत श्वास कोंडण्याची समस्या
* कोविड व कोविडनंतर झालेले फुफ्फुसांचे आजार
* इतर फुफ्फुसांच्या आजारांवर तज्ञांचा सल्ला व उपचार
उपलब्ध सुविधा
* संगणकाद्वारे फुफ्फुसांच्या कार्यक्षमता व गुणधर्माची तपासणी
* दुर्बिणीद्वारे फुफ्फुसाची तपासणी
* छातीची शस्त्रक्रिया
* झोपेची तपासणी
अपॉईटमेंटसाठी संपर्क : 9359260250
मुथ्था चेंबर्स, चंगेडिया मेडिकल शेजारी, माळीवाडा, अ.नगर (प्रत्येक शुक्रवारी)

House Fly Trap
आपल्या घरात, गोठ्यात, हॉटेलमध्ये माशा वाढल्या असतील तर रोगाला निमंत्रण न देण्यासाठी हाऊस फ्लाय ट्रॅप लावा.
KKS
माश्यांवर १००% इलाज
पोल्ट्री मध्ये, हॉटेल मध्ये, बगिचा मध्ये, दूध डेअरी मध्ये, मिठाई दुकान मध्ये, कचरापेटी जवळ, जनावरांच्या गोठ्यात या ठिकाणी हाऊस फ्लाय ट्रॅप लावा.
लगेच ऑर्डर करा..
9423787961 / 8308206161

फक्त 15 मिनिटात सोने तारण कर्ज
9% व्याजदर
शुन्य टक्के प्रोसेसिंग फी
प्रति तोळा ₹ 58000
लक्ष्मीनारायण सहकारी नागरी पतसंस्था मर्या.
78882 19471, 94231 67850
बागडपट्टी, अहमदनगर

संपूर्ण स्टेशनरी वस्तूंमध्ये १०% सूट
गिफ्ट ॲण्ड स्कूल स्टेशनरी | होलसेल ॲण्ड रिटेलर एक्सक्लुझिव्ह गिफ्ट, पर्सनालाईझड गिफ्ट ॲण्ड टॉईज
आर.एन.आर्ट ॲण्ड क्राफ्ट
काका खवावालासमोर, नेता सुभाष चौक, चितळेरोड, अ.नगर मो : 9325329061/ 9373417113

टिप : मुव्ही-शो च्या वेळा बदलु शकतात
दिनांक : 12 ते 19 जुलै 2024
कल्की (2D) 9.00 AM, 3.30 PM, 10.15 PM (3D) 12.00 PM, 7.15 PM
सरफिरा 7.30 AM, 10.30 AM, 4.15 PM 7.15 PM, 10.45 PM
हिन्दुस्तानी २ 9.00 AM, 3.30 PM 9.45 PM
रांगडा (मराठी) 12.30 PM
बाई गं (मराठी) 1.30 PM, 7.00 PM
- For Screen No. 3 All Recliner Pay 50 Extra & Get 150 Food Voucher*
- Offer Valid On Window Booking & Phone Booking
Ahmednagar's First & Most Luxurious Cinematic Paradise !
CONNPLEX SMART THEATRE
AVAILABLE ON bookmyshow
3rd Floor, Kohinoor Mall, Premdan Chowk, Savedi, A.Nagar
Mo. 6353564618 / 7790094001

EARTH's Green Library
Greenery for Every Space
Get a Plant Today!
• Potted Planters
• Premium Planters
• Garden Accessories
• Garden Furniture
• Garden Lightings
Fresh Environment with Indoor Plants
Amit Sanklecha 99231 43334
Website : greenlibrary.in
Opp. Ramadevi Temple, Next to Kamada Machine Tools, Zopadi Canteen, Savedi, AHMEDNAGAR - 414 003

VAISHNAVI TILES & TRADING CO.
• सर्व प्रकारच्या टाइल्स • ग्रॅनाइट • सॅनिटरी वेअर
• पीव्हीसी पाईप्स आणि फिटिंग • C.P. फिटिंग्ज
9590151515 | 9262515151
VARMORA TILES • BATHWARE | KERAKOLL The GreenBuilding Company | CARYSIL German Engineered | colortile | RAK CERAMICS | NIRALI | TIMEX | ICON
प्लॉट नं.5, हुंडेकरी शोरूमच्या मागे, सावेडी, अहमदनगर

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

## विठु माझा लेकुरवाळा.. पंढरपुरी भक्तांचा सोहळा...

आज आषाढी एकादशी. अवघ्या महाराष्ट्राचे आराध्य दैवत पांडुरंगाच्या चरणी लीन होण्यास, किमान चंद्रभागेत स्नान करून कळस दर्शनासाठी लाखो वारकरी पंढरपुरी आलेत. वाळवंटीच्या काठी भक्तीचा अनोखा खेळ मांडला आहे. ओडीशापुरीच्या जगन्नाथ रथयात्रेप्रमाणे हा सोहळा अनुपम, सौंदर्याने नटलेला, अद्वितीय असतो.

शेकडो–हजारो वर्षांची ही दिंडी वारकऱ्यांची परंपरा आजही दिमाखात व अखंडीतपणे चालू आहे. विठ्ठलनामात बेभान होऊन जीवन जगणाऱ्यांचे भाग्य ते काय वर्णावे?

विठु माझा लेकुरवाळा । संगे लेकुरांचा मेळा । असे म्हणणारी 'नामयाची जनी' म्हणजेच संत जनाबाईची भक्ती आठवा.






जन्मापासून वेदनांशी नाते असलेल्या जनाईने अखंड नामस्मरण व श्रद्धेने कष्टालाही विठुप्रेमाचा आशीर्वाद मिळवला.

''झाडलोट करी जनी । केर भरे चक्रपाणी ।। पाटी घेउनिया शिरी । नेउनिया टाकी दूरी ।।'' काय ती उत्कट श्रद्धा! साक्षात विठुराया तिचे काम करतोय. तेव्हाचे समाजजीवन, रीतीरिवाज, परंपरा अशा होत्या. ''सुंदर माझे जाते – गे फिरे बहुतेके । ओव्या गाउ कवतुके । तू ये रे बा विठ्ठला ।'' हरीनामाचे, नामस्मरणाचे जाते फिरवत राहा नाही तर युगानुयुगे जन्ममरणाच्या चक्रात फिरतच राहावे लागेल.

# खोटे दिव्यांग जन्माला घालणारे जिल्हा रुग्णालय व गरीब निर्माण करणाऱ्या 'महसूल'ची चौकशी करावी

### भारतीय जनसंसदेची मुख्य सचिवांकडे निवेदनाद्वारे मागणी

नगर – खोटे दिव्यांग जन्माला घालणारे अहमदनगर जिल्हा रूग्णालय (सिव्हील हॉस्पिटल) आणि गरिब निर्माण करणारे उत्पन्नाचे खोटे दाखले देणारे महसूल विभाग यांची सखोल चौकशी करून कडक कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी भारतीय जनसंसदेने केली आहे.

या संदर्भात राज्याच्या मुख्य सचिवांना निवेदन देण्यात आले असून त्यात भारतीय जनसंसदेचे राज्याध्यक्ष अशोक सब्बन व जिल्हाध्यक्ष सुधीर भद्रे यांनी म्हटले आहे की, पूजा दिलीप खेडकर यांची यूपीएससी मार्फत आयएएस पदावर निवड झाली. त्या ओबीसी– दिव्यांग, संवर्गातून निवडल्या गेल्या. भविष्यात त्या जिल्हाधिकारी, सचिवपदावर बसल्या असत्या (चौकशीत क्लिन चीट मिळाली तर बसूही शकतात). त्या मूळच्या नगर जिल्ह्यातील पाथर्डी तालुक्यातील आहेत. त्यांचे वडील दिलीप खेडकर हे ही प्रदूषण नियंत्रण मंडळात अधिकारी होते. पूजा यांचे नॉन क्रिमिलेअर (कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न आठ लाखांपेक्षा कमी दाखविणारे) प्रमाणपत्र व दिव्यांग प्रमाणपत्र या दोन्हींबाबत संशय आहे. पूजा यांनी प्रशिक्षणार्थी अधिकारी म्हणून काम करताना पुण्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयात नको ते हट्ट केले. म्हणून त्यांची भंडाफोड झाली. अन्यथा महाराष्ट्राला व देशाला या लाडक्या बहिणीच्या खोडकरपणाची खबरबातही लागली नसती. प्रश्न आता एकट्या पूजा खेडकर यांचा नाही. पूजा यांच्या बातम्या आल्यापासून गत दहा–वीस वर्षात यूपीएससी, एमपीएससी व अगदी वर्ग तीन, चार मधून दिव्यांग व ओबीसी प्रवर्गातून निवड झालेल्या अनेक उमेदवारांच्या नावांची चर्चाही सुरू झाली आहे. या उमेदवारांची दिव्यांग व नॉन क्रिमिलेअरची प्रमाणपत्रे नियमानुसार आहेत का? ही शंका आहे.

अहमदनगर जिल्ह्यातील एक अधिकारी परराज्यातील केडरमध्ये आयएएस आहेत. ते पूर्वी प्राथमिक शिक्षक होते. त्यांची निवड ही दिव्यांग कोट्यातून झाली आहे. त्यांनाही पूजा प्रमाणे नगर जिल्हा रुग्णालयानेच दिव्यांग प्रमाण प्रत्र दिले असणार असे वाटते.

या घोटाळ्याच्या मुळाशी जिल्हा रुग्णालये व महसूल विभाग आहे. दिव्यांगांना नोकरीत आरक्षण आहे. बदलीतही सवलत आहे. दिव्यांग कर्मचाऱ्यांना विशेष भत्ताही मिळतो. यासाठी अनेक धडधाकट लोक दिव्यांग प्रमाणपत्र काढतात व नोकऱ्या बळकावतात. इतर कुठल्याही सामाजिक आरक्षणापेक्षा हे आरक्षण मिळविणे खूप सोपे बनले आहे. कारण हे प्रमाणपत्र देण्याचे अधिकार जिल्हा रुग्णालयांना आहेत. ही रुग्णालये अगदी खिरापतीसारखी प्रमाणपत्रे वाटताना दिसत आहेत.

मे २०१२ मध्ये अहमदनगर जिल्हा परिषदेत सोयीच्या बदल्या मिळविण्यासाठी तब्बल २२३ शिक्षकांनी दिव्यांग प्रमाणपत्रे सादर केली होती. प्रमाणपत्रांची तपासणी केल्यानंतर तब्बल ७६ शिक्षकांनी बनावट प्रमाणपत्रे तयार करून ती सादर केली असल्याचे निदर्शनास आले. म्हणून ७ डिसेंबर २०१२ रोजी या सर्वांवर गुन्हा दाखल झाला. त्यात पुढे जिल्हा रुग्णालयातील काही डॉक्टरही आरोपी झाले. आरोपींची ही संख्या ९६ पर्यंत गेली होती. शिक्षक व डॉक्टरांसारखे लोक नैतिकता सोडून खोटारडेपणा करतात, हे तेव्हा समोर आले. हा खटला अजूनही सुरू आहे. पुढे दिव्यांग प्रमाणपत्रे ऑनलाइन करण्याचे धोरण आले. त्यामुळे आता रुग्णालया बाहेर बनावट प्रमाणपत्र बनवून फायदा नाही. कारण आता प्रमाणपत्र ऑनलाइन दिसत नसेल तर ते खोटे आहे, हे लगेच सिद्ध होते. म्हणून आता घोटाळ्याची पद्धत बदलली आहे.

आता जिल्हा रुग्णालयांतील तज्ज्ञ हॉक्टरांना व तेथील टीमलाच मॅनेज केले जाते. म्हणजे व्यक्तीला डोळ्याने नीट दिसत असेल तरी डोळ्याचे तज्ज्ञ म्हणविणारे डॉक्टर त्याला ४० टक्के दिव्यांग ठरवतात. संबंधित तज्ज्ञ, अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा शल्यचिकित्सक असे तिघांचे मंडळ त्यानुसार प्रमाणपत्र बनवतात व धडधाकट व्यक्ती दिव्यांग बनतो. जोवर हे प्रमाणपत्र एखादे वरिष्ठ वैद्यकीय बोर्ड चुकीचे ठरवत नाही, तोवर हे प्रमाणपत्र ग्राह्य मानणे भाग आहे. मध्यंतरी जिल्हा परिषदेच्या काही कर्मचाऱ्यांच्या या प्रमाणपत्रांची पुण्यातील 'ससून' या सरकारी रुग्णालयामार्फत पडताळणी झाली. मात्र, तेथील डॉक्टरांनी खालचाच गोंधळ कायम ठेवत अनेक धडधाकट कर्मचारी दिव्यांगच दाखविले. यातून विरोधाभास असा तयार झाला की, विविध सरकारी यंत्रणांना समोरचा व्यक्ती दिव्यांग नाही हे स्पष्टपणे दिसत आहे. मात्र, त्याच्या हातात प्रमाणपत्र असल्याने त्याला मजबुरीने लाभ देणे भाग पडत आहे. यातून अनेक खोटे दिव्यांग जन्माला आले.

खऱ्या दिव्यांग व्यक्तीपेक्षा है बनावट दिव्यांग काहीही शरम न बाळगता फायदे लाटत आहेत, त्यांना दिव्यांग बनविणाऱ्या डॉक्टरांनाही यात अपराधीपणा वाटत नाही, कारणा त्यांची कुणी चौकशीही करत नाही. राज्यकर्ते, समाज या सर्वांचे याकडे दुर्लक्ष आहे. नगर जिल्हा परिषदेने या प्रमाणपत्रांची तपासणी करण्याची भूमिका घेताच काही कर्मचारी अशी तपासणी होऊ नये, यासाठी खंडपीठात गेले. तेथे तारीख पे तारीख सुरू आहे. पण व्यवस्थाच मूकबधिर बनली आहे. एकाही आरोग्यमंत्र्यांला अथवा समाज कल्याण मंत्र्याला या बोगस दिव्यांगांचे काहीच वाटत नाही. कोणत्याही मंत्र्याला जिल्हा रुग्णालयात नेमके काय सुरू आहे हे जाऊन पाहावे वाटले नाही. नगर जिल्ह्यातील आमदार याबाबत विधिमंडळात कधी प्रश्न उपस्थित करताना दिसले नाहीत. प्रशासनासह सगळेजण हा घोटाळा मूकपणाने पाहत गेले व पोसत गेले. त्यामुळे ही कीड थेट यूपीएससी पर्यंत पोहोचली. कान, डोळे हे सर्वकाही शाबूत असणारी व्यक्ती दिव्यांग म्हणून थेट जिल्हाधिकाऱ्याच्या खुर्चीपर्यंत पोहोचणार असेल तर याला काय म्हणणार? देशासमोर हे केवढे मोठे आव्हान आहे. त्यामुळे हा प्रश्न केवळ पूजा खेडकर यांच्यापर्यंत थांबत नाही. शिपायांपासून, कलेक्टरच्या खुर्चीपर्यंत खोटे दिव्यांग बसले असतील तर त्यांना शोधणे महत्त्वाचे आहे. खोटे दिव्यांग जन्माला घालणारे डॉक्टर शोधून त्यांचे लायसन्स रद्द करणे आवश्यक आहे.

आपण या प्रकरणात त्वरीत लक्ष घालून सक्षम अधिकाऱ्यांकडून चौकशी करून दोषींवर कडक कायदेशीर कारवाई करण्यात यावी व प्रामाणिक नागरिकांना दिलासा व कायदेशीर संरक्षण देण्यात यावे, असे सब्बन व भद्रे यांनी म्हटले आहे.




रस्ते आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा माजी नगरसेविका शारदा ढवण यांनी मनपा आयुक्त यशवंत डांगे यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे. समवेत अनिल ढवण, भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे आदी.

# रस्ते आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मार्गी लावावा अन्यथा आंदोलन करू

नगर – सावेडी उपनगरातील नव्याने विकसित होणारा भाग असून या ठिकाणी नागरी वसाहती झपाट्याने वाढत आहेत, त्यामुळे रस्त्यांचा प्रश्न गंभीर बनला असून नागरिक, शालेय विद्यार्थ्यांचा दळणवळणाचा प्रश्न निर्माण झाला आहे, त्यातच आता पावसाळा सुरु झाला असून येथील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली आहे, वाहन तर लांबच पायी चालणे देखील अवघड झाले आहे, व प्रभागात पिण्याच्या पाण्याची तीव्र टंचाई निर्माण झाली आहे, फेज २ लाईनचे काम पूर्ण झाले असुन ती लाईन चालू करण्यात यावी, प्रभागातील बऱ्याचश्या भागातील नागरिकांना पिण्याच्या पाण्यापासून वंचित रहावे लागत आहे.

यासाठी आयुक्त यशवंत डांगे यांनी प्रत्यक्ष प्रभागात येवून समस्यांची पाहणी करीत या समस्या येत्या १५ दिवसात मार्गी लावण्याचा प्रयत्न करावा अन्यथा अन्यथा आंदोलन करू असा इशारा माजी नगरसेविका शारदा ढवन यांनी आयुक्तांना निवेदनातून दिला.

यावेळी भगवान फुलसौंदर, बाळासाहेब बोराटे अनिल ढवण, महेश तवले, विशाल नाकाडे, वैभव लांडगे, श्री. सातपुते, श्री. ठोंबरे, चंदू टाके, नितीन बहाड, विजय ढवण, विकी ढवण, मयूर बुळे, मनोज भांड,जावेद शेख, पंकज पोंधे, संकेत ढवण, अरुण खांदवे, रोहन ढवण,सचिन खाटेकर, सूरज भुकण, प्रमोद घोडके, श्रेयस लोखंडे, अतुल कातोरे उपस्थित होते,

प्रभाग क्र. १ मधील गावडे मळा परिसरातील गणेश डेअरी ते गोकुळधम अपार्टमेंट ते इस्कॉन मंदिर रस्ता खडीकरण व डांबरी करणं करणे. प्रभाग क्र. १ मधील ढवणवस्ती, कजबे वस्ती, फणसे मळा, लेखा नगर, दक्षता नगर, माऊली नगर, स्वामी गजानन कॉलनी, राजनगर या परिसरातील फेज–२ लाईनचे काम पूर्ण झाले असून या सर्व लाईन मॅन ८ इंची लाईन ला जोडून चालू करण्यात यावी, प्रलंबित विकास कामे आपल्या स्तरावरून योग्य ती कारवाई करून कामे लवकरात लवकर मार्गी लावावे अन्यथा आपल्या दालनात येत्या १५ दिवसात तीव्र आंदोलन करण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी मनपा प्रशासनाची राहील असा इशारा देण्यात आला. यावेळी आयुक्त डांगे यांनी प्रभागातील समस्यांची पाहणी करण्याचे व सर्व प्रश्न टप्प्याटप्प्याने मार्गी लावण्याचे आश्वासन दिले.



महसुल कर्मचारी संघटनेचे दुसऱ्या दिवशीही कामबंद आंदोलन करण्यात आले.

# महसुल कर्मचारी संघटनेचे सलग दुसऱ्या दिवशीही कामबंद आंदोलन

नगर – विविध मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर महसूल कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र आंधळे, माजी अध्यक्ष भाऊसाहेब डमाळे व उपाध्यक्ष अशोक मासाळ, संतोष झाडे, जिल्हा सरचिटणीस स्वप्निल फलटणे, अक्षय फलके यांच्या नेतृत्वाखाली काम बंद आंदोलन करून दुसऱ्या दिवशी संघटनेच्या वतीने उपोषणा स्थळी आयुर्वेदचार्य डॉ. महेश मुळे यांचे आरोग्य व मानसिक ताणतणाव या विषयावर व्याख्यान ठेवण्यात आले होते.

यावेळी नायब तहसीलदार कैलास साळुंखे, नायब तहसीलदार किरण देवतरसे, नायब तहसीलदार सोना मगर यांच्या प्रमुख उपस्थितीत व्याख्यान झाले. मध्यवर्ती संघटनेचे अध्यक्ष सुभाष तळेकर, डॉ. मुकुंद शिंदे, नलिनी पाटील, महिला अध्यक्ष वंदना नेटके, दिगंबर करपे, नितीन मुळे, राजेंद्र लाड, शेखर साळुंखे, भरत गोरे, अजय ढसाळ, ज्ञानेश्वर खोलम, दीपक चन्ने, संतोष धोंगडे, शंकर जगताप, आप्पा खरात, गणेश कोळकर, वैभव साळवे, प्रदीप आव्हाड, कीर्ती कदम, माधवी पुंडे, स्वाती फुलारे, सीमा आरगडे, प्रिया धोत्रे, सुषमा उमाप नलिनी पाटील, सयाजीराव वाव्हळ, महसूल संघटनेचे ज्योती दांगट, पुनम गावडे, माधवी पुंडे, गांधी मॅडम, सारिका उंडे, सुषमा उमाप, स्वाती फुलारी, रामेश्वर कर्पे, लक्ष्मण बेरड, विजय कवडे, रवींद्र गोफने आदीसह महाराष्ट्र राज्य महसूल कर्मचारी संघटनेचे व कोषागार विभागाचे सर्व कर्मचारी उपस्थित होते. व आज दुसऱ्या दिवशी जिल्हा कोषागार कर्मचारी संघटनेच्या वतीने देखील आंदोलनास पाठिंबा देण्यात आला आहे.

# योजनेच्या अंमलबजावणीसाठी प्रशासनाच्या सर्व विभागांनी एकत्रित समन्वयाने काम करा

### मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करावी : जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांचे निर्देश

नगर – राज्यातील युवकांना त्यांच्या शिक्षणानंतर प्रत्यक्ष कामाचे प्रशिक्षण देऊन त्यांची नोकरी मिळण्याची क्षमता वाढविण्यासाठी शासनाने मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना सुरु केली आहे. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील अधिकाधिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देत योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करून जिल्हा अग्रेसर राहील यादृष्टीने सर्व विभागांनी एकत्रित व समन्वयाने काम करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांनी दिले.



जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहामध्ये मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणी आढावा बैठकीत मार्गदर्शन करताना जिल्हाधिकारी सिध्दराम सालीमठ.

जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेच्या अंमलबजावणीबाबत आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. त्याप्रसंगी जिल्हाधिकारी श्री. सालीमठ बोलत होते.

यावेळी कौशल्य, रोजगार व उद्योजकता विभागाचे सहायक संचालक निशांत सुर्यवंशी यांच्यासह संबंधित विभागाचे प्रमुख अधिकारी, विविध कंपन्या, जिल्ह्यातील औद्योगिक संघटना, खासगी आस्थापनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ म्हणाले की, या उपक्रमांतर्गत तयार केलेल्या www.mahaswayam.gov.in या संकेतस्थळाच्या माध्यमातुन रोजगार इच्छुक उमेदवार आणि रोजगार उपलब्ध करुन देणारे उद्योजक जोडले जातील. रोजगार इच्छुक उमेदवारांना प्रत्यक्ष कामाचा अनुभव प्रशिक्षणातुन मिळुन त्यांची क्षमतावाढ होईल.

तसेच उद्योजकांना त्यांच्या उद्योगासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ या माध्यमातुन मिळणार आहे. १८ ते ३५ वर्षे वय असलेल्या युवकांना योजनेमध्ये सहभागी होता येणार असुन या योजनेंतर्गत १२ वी पास असणाऱ्या युवकांना ६ हजार रुपये, आय.टी.आय अथवा पदविका धारकांना ८ हजार रुपये तर पदवीधर, पदव्युत्तर युवकांना १० हजार रुपये शासनाकडुन डीबीटीद्वारे थेट विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये विद्यावेतन सहा महिन्यांसाठी देण्यात येणार असुन अतिरिक्त विद्यावेतन देण्यास आस्थापनांना मुभा राहणार आहे. योजनेंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना–उद्योजकाकडे एकुण कार्यरत मनुष्यबळाच्या १० टक्के व सेवा क्षेत्रासाठी २० टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येणार असल्याचेही जिल्हाधिकारी श्री. सालीमठ यांनी यावेळी सांगितले.

जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात सहकारी साखर कारखाने, दुध डेअरी, सहकारी सोसायटी तसेच विविध लघु व मध्यम उद्योग, विविध बँका, शासकीय, निमशासकीय आस्थापना आहेत. या आस्थापनांना सातत्याने कुशल मनुष्यबळाची आवश्यकता भासते. या सर्व आस्थापनांसोबत एकत्रित बैठक घेण्यात येऊन त्यांच्याकडुन त्यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची माहिती एकत्रित करण्यात येऊन मागणीनुसार युवकांना रोजगारच्या संधी उपलब्ध करुन देण्याचे निर्देशही जिल्हाधिकारी श्री. सालीमठ यांनी यावेळी दिले.

बैठकीत विविध विभागाचे प्रमुख अधिकारी, विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, सहकारी संस्थांच्या प्रतिनिधींनी योजनेच्या अंमलबजावणीसाठी उपयुक्त अशा सुचना केल्या.

## श्रीमती पार्वतीबाई जोंधळे यांचे निधन

नगर – शिवपार्वती, चैतन्यनगर येथील रहिवासी, आश्वी (संगमनेर) येथील विद्यालयाच्या माजी मुख्याध्यापिका श्रीमती पार्वतीबाई शिवाजी जोंधळे (वय ९१) यांचे १७ जुलै रोजी वृद्धापकाळाने निधन झाले.



त्यांच्या इच्छेप्रमाणे देहदान करण्यात आलेले आहे ते विखे पाटील हॉस्पिटल येथे करण्यात येणार आहे.

त्यांच्या पश्चात ३ मुले, १ मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे. पार्वतीबाई या सौ. विजया दिलीप काळे, इंडो–आयरिश हॉस्पिटलचे डॉ. दिलीप जोंधळे, ज्ञानेश्वर जोंधळे, यशवंत पाटील जोंधळे यांच्या मातोश्री होत.

## श्रीमती पुष्पाबाई दुधेडिया यांचे निधन



श्रीरामपूर – येथील श्रीमती पुष्पाबाई रमणलाल दुधेडिया (वय ७०) यांचे दुःखद निधन झाले. त्यांच्या पश्चात दिर, दोन मुले, तीन मुली, पुतणे, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

सुरेश दुधेडिया यांच्या भावजई,नितीन, संतोष, मनोज, विपुल व चंदन दुधेडिया यांच्या चुलती, यशश्री गृह उद्योगचे सुनिल व संदीप दुधेडिया यांच्या मातोश्री होत.

# अहमदनगर मर्चंटस बँकेला रिझर्व्ह बँकेकडून चेक क्लिअरिंगची डायरेक्टर मेंबरशिप प्राप्त

### मेंबरशिप मिळवणारी नगर जिल्ह्यातील पहिलीच सहकारी बँक : संस्थापक हस्तीमल मुनोत

नगर – अहमदनगरच्या सहकारी बँकिंग क्षेत्रामध्ये प्रथमच अहमदनगर मर्चंट को–ऑपरेटिव्ह बँकेला रिझर्व बँक ऑफ इंडिया कडून क्लिअरिंगची डायरेक्ट मेंबरशिप मिळाली आहे यामुळे ग्राहकांना आउटवर्ड क्लिअरिंगची चेक भरण्याची सुविधा ही अडीच वाजेपर्यंत अशी वाढून मिळणार आहे. तसेच नुकतेच सन २०२३–२४ या आर्थिक वर्षाचे परीक्षण पूर्ण झाले असून लेखापरीक्षकांनी बँकेस 'अ' वर्ग प्रदान केला आहे, अशी माहिती बँकेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी दिली.



चेअरमन हस्तीमल मुनोत यांनी सांगितले की, अहमदनगर मर्चंट को–ऑपरेटिव्ह बँक नेहमीच नवनवीन सुविधा आणि सेवा उपलब्ध करून देत असते. सहकारी बँकिंग क्षेत्रात नगर जिल्ह्यात सर्वात प्रथम संगणकीकृत कामकाज मर्चंटस बँकेत सुरू झाले होते. नेट बँकिंग, मोबाईल बँकिंग, क्युआर कोडव्दारे ऑनलाईन पेमेंट, युपीआयव्दारे गुगल पे, फोन पे, भीम ॲपव्दारे सेवा उपलब्ध आहे. इंटरनेटवर ई स्टेटमेंट, ई पासबुक, डायरेक्ट आरटीजीएस व एनईएफटी सुविधा, आयएमपीएस, भारत बिल्स पेमेंट, पॉझिटिव्ह पे सिस्टिम, एटीएम रिसायकलर मशीन, किऑस्क पासबुक मशीन इत्यादी अत्याधुनिक सोयी सुविधा बँकेने उपलब्ध करून दिल्या आहेत. खातेदारांना अधिक जलद, अचूक सेवा मिळण्यासाठी संचालक मंडळाने सॉफ्टवेअर अपग्रेडेशन करण्याचा निर्णय घेतला होता. त्याप्रमाणे सदरचे अपग्रेडेशन लवकरच पूर्ण करण्यात येईल. यात एपीआय (अरिदमेटिक प्रोग्रामिंग इंटरफेस) आणि एआय (आर्टिफिशियल इंटेलिजन्स) चा वापर करण्यात येणार आहे. जागतिक दर्जाच्या या सुविधेमुळे ग्राहकांना त्यांचे बँकिंग व्यवहार करणे अधिक सुलभ होणार आहे.

व्हाईस चेअरमन अमित मुथा यांनी सांगितले की, मर्चंटस बँकेच्या एमआयडीसी शाखेचे दर्शना हाईटस्, नगर–मनमाड रोड, एम.आय.डी.सी., नागापुर येथील नूतन वास्तुतील स्थलांतर व उद्‌घाटन बँकेचे संस्थापक व विद्यमान चेअरमन हस्तीमल मुनोत यांच्या हस्ते व एल अ‍ॅण्ड टी कंपनीचे बिझनेस उपाध्यक्ष अरविंद पारगांवकर यांच्या अध्यक्षतेखाली २२ जुलै रोजी दुपारी ४ वा. होणार आहे. या कार्यक्रमास सभासद, ग्राहकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन सर्व संचालक मंडळाने केले आहे.

# शिक्षिकेचा वारंवार पाठलाग करून त्रास देणाऱ्या दोघांवर गुन्हा दाखल

नगर – शिक्षिकेचा वारंवार पाठलाग करून त्यांचा विनयभंग करणाऱ्या दोन तरूणांविरूध्द तोफखाना पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सावेडी उपनगरात राहणाऱ्या पीडित शिक्षिकेने या प्रकरणी मंगळवारी (दि.१६) पहाटे तोफखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दिग्विजय गणेश गावडे (रा. रावसाहेब पटवर्धन स्मारका जवळ, प्रोफेसर चौक, सावेडी) व सलमान रॉय (पूर्ण नाव व पत्ता नाही) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. सन २०२० मध्ये फिर्यादीची दिग्विजय सोबत सोशल मीडियाच्या माध्यमातून ओळख झाली होती. तेव्हापासून तो फिर्यादीसोबत वारंवार संपर्क करू लागला. १८ फेब्रुवारी २०२० रोजी रात्री साडेअकराच्या सुमारास फिर्यादीच्या घरात प्रवेश करून त्यांच्यासोबत लज्जा उत्पन्न होईल असे वर्तन केले होते. यासंदर्भात त्याच्या आईला सांगितल्याने फिर्यादी यांनी पोलिसांत गुन्हा दाखल केला नव्हता.

दरम्यान २७ मे २०२४ रोजी त्याने फिर्यादीला अश्लिल भाषेत मेसेज केले. घरासमोर येऊन शिवीगाळ केली. यासंदर्भात फिर्यादीच्या पतीने त्याला फोन करून जाब विचारला असता त्यांना हातपाय तोडण्याची धमकी दिली. त्यानंतर ७ व १५ जुलै २०२४ रोजी त्याने फिर्यादीला त्याच्या व मित्र सलमान याच्या मोबाईलवरून फोन करून त्रास दिला. त्याच्या या त्रासाला कंटाळून फिर्यादीने तोफखाना पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी दिग्विजयसह त्याचा मित्र सलमान विरोधात गुन्हा दाखल केला आहे. अधिक तपास पोलीस करत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### ॲसिडीटी टाळण्यासाठी उपाय

उपाशीपोटी राहण्याची सवय टाळा. आजच्या जीवनात पोट रिकामे ठेवून दिवसभर कामात व्यस्त राहणाऱ्या व्यक्तींना हा त्रास खात्रीने होतो. जेवणाच्या वेळा ठराविक असाव्यात. दर चार तासांनी थोडे थोडे खावे.

रात्री जेवल्यावर अर्धा तास शतपावली करावी. चालण्याचा व्यायाम करून वजन आणि विशेषत: पोट कमी करावे. आहारामध्ये जास्त तिखट, मसालेदार, तेलकट पदार्थ खाणे टाळा.

## पाककला

### पाटवड्या

**साहित्य** – चार वाट्या जाडसर बेसन, अर्धी वाटी सोयाबीन किंवा ओटस्चं पीठ, एक वाटी आंबट ताक, तीन वाट्या पाणी, दोन वाट्या गाजराचा कीस, दहा–बारा हिरव्या मिरच्या, वीस–पंचवीस कढीलिंबाची पाने, एक मोठा चमचा ओवा, तीन मोठे चमचे तीळ, एक वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, अर्धी वाटी ब्रेडक्रम्स, चवीला मीठ, हवे असल्यास तिखट, एक वाटी तेल फोडणीसाठी, मोहरी, हिंग, हळद.

**कृती** – बेसनात ताक, पाणी, तिखट, मीठ, ओवा, दोन मोठे चमचे तीळ मिसळावे. हिरवी मिरची आणि कढीलिंब यांचा ठेचा करावा. फोडणी करून त्यात ठेचा आणि गाजराचा कीस परतावा. त्यात बेसनाचे मिश्रण घालून ढवळावे आणि झाकण ठेवून वाफ आणावी. मिश्रण घट्ट होईल. त्यात कोथिंबीर घालून गोळा करावा. थाळीला तेलाचा हात लावावा आणि त्यात हे मिश्रण गरम असतानाच थापावे. वर तीळ पसरावे. गार झाल्यावर चौकोनी किंवा शंकरपाळ्यासारख्या मोठ्या वड्या पाडाव्या. पाटवड्या आदल्या दिवशी करून ठेवता येतात. ऐनवेळी ब्रेड क्रम्समध्ये घोळवून, तव्यावर थोड्या तेलात परताव्या किंवा तेलाचा हात लावून ओव्हनमध्ये १८० सें. वर लालसर होईपर्यंत भाजाव्या.

## वास्तू

### कौटुंबिक बांधिलकीसाठी

* बेडरुमच्या दक्षिणेकडील भिंतीवर पती–पत्नीचा किंवा तुमच्या कुटुंबाचा ग्रुप फोटो आवर्जुन लावावा. या योगे कुटुंबातील सर्व व्यक्ती एकमेकांशी सदैव प्रेमरज्जूंनी बांधलेल्या राहतील.

* डबलबेडवरची गादी अखंड असावी. त्यावरील बेडशीट व पिलोकव्हरची रंगसंगती दोघांचेही चित्त उल्हासित करणारी असावी.

## सौंदर्य

ताज्या लिंबाचा रस २ चमचे + ग्लिसरीन १ चमचा + गुलाबपाणी तीन चमचे. हे सर्व एकत्र करून हे मिश्रण फ्रीजमध्ये ठेवा. जरुरीप्रमाणे यांचा वापर करावा.

## सल्ला

कांदा लवकर परतला जाण्यासाठी त्यात थोडीशी साखर मिसळावी. कांद्याचा रंग ब्राऊन होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# दैनिक पंचांग

गुरुवार, दि. १८ जुलै २०२४

**वामन पूजन, शके १९४६ क्रोधीनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, ज्येष्ठा २७।२५, सूर्योदय ०६ वा. २७ मि. सूर्यास्त ०६ वा. २८ मि.**

## राशिभविष्य

**मेष** : प्रेमसंबंधांमध्ये आवश्यक प्रगती होईल. आपल्या आरोग्याची काळजी घ्या. कामांमध्ये प्रगती होईल. मातृपक्षाकडून प्रसन्नता राहील. शत्रू पराभूत होतील.

**वृषभ** : आपल्या धाडसात वाढ होण्याची शक्यता आहे. आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर वेळ घालवा. इच्छेवर आणि मनस्थितीवर संयम ठेवाल.

**मिथुन** : आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. अत्यंत परिश्रम केल्यानंतर थोडे यश मिळेल. पैशाच्या बाबतीत आपली नड भागेल. कौटुंबिक समस्या निर्माण होण्याची शक्यता आहे.

**कर्क** : आपल्या व्यवसायात काहीतरी चांगले घडून येणार आहे. वाहने काळजीपूर्वक चालवा. एखाद्या विशिष्ट योजनेला हातावेगळे करण्यात बराच वेळ जाईल. व्यापार–व्यवसायात स्थिती सुखद राहील.

**सिंह** : आपल्या शत्रूंवर आपला प्रबळ प्रभाव राहील. भावनाशील असल्यामुळे नुकसान होणे शक्य आहे. वेळ अनुकूल आहे. जोखिम असलेले कार्ये टाळाल.

**कन्या** : आज आपणास अनुकूल वार्ता मिळतील. आरोग्य चांगले राहील. कौटुंबिक विषयांमध्ये आपणास समर्थन मिळेल पण एखाद्याला जामीन देणे टाळा. शांत राहाल.

**तूळ** : कौटुंबिक वातावरण आनंददायी राहील आणि मित्रांकडून पाठबळ मिळेल. अनेक संघर्ष आणि विघ्नांना पार पाडल्यानंतर आज आपणास यश मिळेल.

**वृश्चिक** : आपली प्रसिद्धी वाढण्याची शक्यता आहे. आपले धाडस वाढेल. कार्यक्षेत्रात वेगाने कार्य कराल. आरोग्य उत्तम राहील. राजकीय विषयांमध्ये स्थिती सुखद राहील.

**धनु** : आपल्या महत्त्वाकांक्षा पूर्ण होतील. महत्वपूर्ण कार्यात यश मिळेल. आरोग्य मध्यम राहील. काही प्रेमपूर्ण अनुभव आज येऊ शकतात. आपण आपल्या महत्वाकांक्षा पूर्ण करू शकाल.

**मकर** : व्यापार–व्यवसायात स्थिती सुखद राहील. शत्रूंना मात द्याल. वाद–विवाद टाळण्याचे प्रयत्न करा. आर्थिक पक्षाबाबत सावध राहाल. गंभीर आणि योजनाबद्ध प्रयत्नांनी आपणास यश मिळेल.

**कुंभ** : व्यवसायात प्रगती कराल. स्थिती अनुकूल राहील. आरोग्य उत्तम राहील. आरोग्य मध्यम राहील. अधिकार क्षेत्रात वाढ होईल. इतरांवर चुकीचा प्रभाव पडू शकतो.

**मीन** : आर्थिक विषयांसाठी स्थिती अनुकूल आहे. धनाच्या रुपात यश मिळवाल. कुटुंबियांबरोबर वार्तालाप केल्याने एकमेकांच्या गरजा समजण्यात मदत मिळेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा, नगर.**

# शब्दगंध क्र. ६९६९

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | | ५ | ६ | ■ |
| ७ | | | | ■ | ८ | | ९ |
| १० | | ■ | ११ | १२ | | ■ | |
| ■ | ■ | १३ | ■ | १४ | | | ■ |
| १५ | १६ | | ■ | १७ | | ■ | १८ |
| १९ | | | २० | | ■ | २१ | |
| | ■ | ■ | २२ | | | | |
| ■ | २३ | | | | ■ | | ■ |

**आडवे शब्द :–** १) ग्रामीण भागाचे काम पाहणारी एक स्थानिक स्वराज्य संस्था ७) उशिरा पिकणारे धान्य ८) नसणारा; अनवश्य १०) पिकात वाढणारे अनावश्यक गवत ११) एक धातू; रुपे; चांदी १४) मऊ; मृदू; नरम १५) कोठार (लाकडाची वगैरे) १७) एखाद्या तीर्थक्षेत्रातील ठराविक दिवशी नियमित जाणे १९) 'समज'च्या विरुद्ध २१) हलणारे; विनाशी; खंदक; हाळ; हेर २२) व्याजासह झालेली मूळ भांडवालाच्या दुप्पट रक्कम २३) बारीक झणझण; गर्दी करून; पुष्कळ

**उभे शब्द :–** १) भोजनास बसलेल्या अनेक लोकांची रांग २) भाट; स्तुतिपाठक ३) एक धान्य; जव; सातू ४) एक प्रकारचे हलके रेशमी वस्त्र ५) हांजी हांजी; मनधरणी; खुशामत ६) एक समसंख्या; एका महिन्यातील सरासरी दिवस ९) वडील; बाप; जनक; पिता १२) अनेक वस्तू एकत्र करणे; संकलन १३) चारही बाजू समान व चारही कोन नव्वद अंशाचे असा चौकोन १५) इत्यादी; आदी १६) झाडावर वगैरे झरझर पळणारा एक छोटा जीव १८) मिठाची चव २०) उंटाच्या पाठीवरचा उंचवटा; भिस्त २१) एक प्रकारचे पायताण किंवा वहाण

**शब्दगंध क्र. ६९६८ चे उत्तर**

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जा | य | दा | द | ■ | बि | ज | ली |
| र | म | ■ | शा | का | हा | र | ■ |
| ण | ■ | ध | न | ग | र | ■ | वा |
| मा | ■ | म | न | ■ | ■ | ना | क |
| र | प | का | ■ | स | प | का | ळ |
| ण | ■ | व | र | क | ड | ■ | ■ |
| ■ | क | णी | स | ■ | व | ज | न |
| मा | था | ■ | ना | र | ळ | ■ | थ |

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : स्तुतीचा वेगवेगळ्या व्यक्तींवर वेगवेगळा परिणाम होतो. ती विचारी माणसाला नम्र बनवते, मूर्खाला अहंकारी बनवते व दुर्बळांना अधिक दुर्बळ बनवते.

# मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

## कानात तेल टाकावे की नाही?

कानात तेल टाकण्याची आपल्याकडे फार पूर्वीपासून प्रथा आहे. बाळाला तेल चोळून आंघोळ घालण्यासोबतच कानात, नाकात, तेल टाकले जाते. आयुर्वेदामध्ये निरोगी राहण्यासाठी दिवसभर काय करायचे हे सांगतांना कानात तेल टाकणे हा उपक्रम दिलेला आढळतो. कानाच्या आजारांवर सुद्धा औषधी तेलांचा उपचार सांगितलेला आढळतो. आयुर्वेदामध्ये सांगितलेले अनेक उपचार आपल्या सणावारांमध्ये, उपवासाच्या पद्धतीत, आपल्या चालीरीती आहेत. त्यामध्ये गुंफून टाकलेले दिसून येतात. कानात तेल टाकणे, हा त्यातीलच एक उपचार आहे. कान दुखत असल्यास, कानात मळाचे खडे झाल्यास तेल कोमट करून (लसूण तेलात टाकून, ते उकळून, कोमट करून) टाकले जाते. हा अनुभव आपण कधीतरी घेतला असेलच.

परंतु प्रत्येक वेळेस कानदुखी या उपायाने थांबेलच असे नाही. कारण कानदुखीची अनेक कारणे असतात. कोमट तेलाने शेकल्याने बरे वाटू शकते; पण मध्यकर्णातील, हाडातील आजारांमुळे कानदुखी असेल तर त्याने थांबत नाही. कानातील मळाचे खडे तेलाने पातळ होऊन काढायला सोपे जाते; परंतु तेल घातल्याने जंतुसंसर्ग कानाच्या आतपर्यंत पोहचून आजार अधिक गंभीर होऊ शकतो. तेल जर जंतुविरहित नसेल, तर कानाला सूज येऊ शकते. तेलाद्वारे बुरशी कानापर्यंत जाऊन तेथे बुरशीचा संसर्ग होऊ शकतो. बाळाच्या कानात तर तेल न टाकलेलेच चांगले.

वरील विवेचन पाहिल्यावर आपण तेल वापरताना ते स्वच्छ, उकळवून जंतुविरहित केलेलेच वापरावे आणि कान खूप ठणकत असताना, फुटून पू येत असेल त्यावेळेस, कान खूप खाजत असताना तेल वापरू नये. अशा वेळेस नाक, कान, घसा तज्ज्ञांचा सल्ला घेणे चांगले.

## लांडग्याचा बहाणा

एकदा शेळीने आपल्या करडाला चरण्यासाठी बोकडाबरोबर रानात पाठविले. बोकडाबरोबर करडू गवत खाऊ लागले. पलीकडेच एक लांडगा शिकारीसाठी टपून बसला होता. करडावर त्याची नजर जाताच त्याच्या तोंडाला पाणी सुटले. करडू चरत–चरत बोकडापासून दूर गेले की त्याला पळवावे, असा लांडग्याचा विचार होता. पण करडू बोकडाची पाठ सोडत नव्हते. त्याच्या जवळपासच चरत होते. करडाला कसे एकटे पाडावे, असा विचार करीत लांडगा हळूच करडाजवळ आला आणि म्हणाला,

''अरे मुला, आईला सोडून आलास हे काही चांगले नाही. आईजवळ तुला पोटभर दूध प्यायला मिळाले असते. इथे रानात काय गवत चघळत बसलास? मी तुला तुझ्या आईकडे नेऊन सोडतो. चल माझ्याबरोबर.''

त्यावर करडू म्हणाले, ''मामा, मला तर आईनेच बोकडाबरोबर चरायला रानात पाठविले. शिवाय तिने मला येताना बजावून सांगितले, बाळा रानात कोणाच्या गोड बोलण्याला फसू नकोस आणि त्या लांडग्यापासून दूरच राहा.' तुम्ही तर लांडगेमामा. तुम्ही मला येथून थाप मारून दूर न्याल आणि मला टाकाल खाऊन, हे मी केव्हाच ओळखले आहे,'' आपली मात्रा येथे लागू पडत नाही, हे पाहताच लांडगा मागच्या मागे पळून गेला.

**तात्पर्य** : आपणच तेवढे शहाणे समजून वागल्यास इतरजण तिरस्कार करतात.

# जीवन चक्र



त्यामुळे आम्ही निराश होऊ नये. नियमित ध्यानधारणा केल्याने आम्ही यात पारंगत होऊ. ध्यानधारणेत घालविलेला प्रत्येक मिनिट किती लाभदायक आहे याचा आम्हांला अंदाजही नाही. आम्हांला कदाचित आमचं यश आता दिसणार नाही परंतु जे सर्व मिनिट, तास आम्ही ध्यानधारणेत घालविले आहेत त्या सर्वांच फळ तर मिळतेच. आम्हांला काहीच दिसत नाही म्हणून आम्ही ध्यानधारणा करणे सोडले तर परिणामी एखाद्या महान दिवस आम्ही पाहू शकणार नाही ज्या दिवशी आम्हांला प्रकाशाचा बिंदू दिसेल, नंतर आम्हांला निळा प्रकाश दिसेल व आम्हांला आमच्या ध्येयाप्रत पोहचवून चमकदार ज्योतीस भेटविन.

एडिसन सारखे होण्याकरीता तल्लीनतेची आवश्यकता आहे. ह्याचा अर्थ असा आहे की, ज्या दिवशी आम्हांला वाटेल की आम्ही अपयशी होतोय. (ध्यान–धारणेत) आम्ही असे समजावे की आम्ही त्यापासून शिकत आहोत की आम्ही ध्यानधारणेत काय करू नये. आम्हांला ध्यानधारणेदरम्यान ज्योतीच दर्शन झाले नाही तर आम्हांला ह्याबाबत विचार करायला हवा की, आम्ही योग्य पध्दत ध्यानधारणेत वापरली आहे काय, की ध्यानधारणे ऐवजी आम्ही आमच्या भूतकाळ वा भविष्यकाळ विषयीच्या विचारात व्यस्त होतो? पुढील प्रत्येक वेळेला अधिक चांगले करण्याची अपयश एक संधी आहे. आम्हांला २४९९९ गोष्टी माहित असतील. ज्या आम्हांला ध्यानधारणेदरम्यान करायच्या नाहीत आणि २५००० वेळी आम्ही योग्य प्रकारे ध्यान अभ्यास करणे व ध्यान टिकविण्याची पध्दत शिकू आणि त्यावेळी अचानक आम्हांला चमकत्या प्रकाशाच्या कारजांच वरदान प्राप्त होऊन ज्योतीच दर्शन होईल.

आम्ही जेव्हा ध्यानधारणा व प्रार्थनेकरीता बसू तेव्हा निरूत्साही होवू नये. आम्ही आपल्या परिने योग्य पध्दतीने ध्यानधारणा करावी आणि बाकी सर्व परमात्म्यावर सोडून द्यावे. त्यावेळी एक दिवस आम्हांला असे समजेल की आमच्या प्रयत्नांना यश मिळत आहे आणि आम्ही तो स्विच शोधून काढू ज्याद्वारे आम्ही आमच्या अंतरीच्या ज्योतीचा दिवा कायम लावू शकू.

**(कृपाल आश्रम, अहमदनगर)**

# शुद्ध जीवन जीने के मंत्र

हमने पाया कि यौगिक खेती करनेवाली भूमिपर आते ही मन्दिर जैसी शान्ति का अनुभव होने लगता है, बहुत अच्छा एक सुकून–सा महसूस होता है, अपनापन फील होने लगता है। इससे किसान स्वावलम्बी भी हो जाता है क्योंकि खाद बनाना, दवाई बनाना तथा अन्य छोटे–मोटे काम खुद को ही योगयुक्त होकर करने पड़ते हैं जिससे जमीन, बीज, खाद, पानी, बुआई सबमें सशक्त प्रकम्पन्न फैल जाते हैं। साथ ही व्यक्ति तथा प्रकृति के ऊपर भी बहुत ही अच्छा प्रभावशाली सकारात्मक प्रभाव पड़ता है जिससे सुखशान्ति भरा जीवन व्यतीत करने में मदद मिलती है।

यौगिक खेती के अन्तर्गत हमने बाबा के संगीत द्वारा पेड़–पौधों के पत्तों को सिकुड़ने एवं झड़ने (पर्णगुच्छ) के रोग पर नियंत्रण पाया है। ऐसे ही २५० मि.ली. गाय के दूध, २ चम्मच हल्दी में १५ मि.ली. पानी मिलाके स्प्रे करने से भी इस रोग पर कन्ट्रोल हुआ है। गुड़ के प्रयोग से अनाज की फसल पर और बेल वाली सब्जी तथा फल पर कीट नियंत्रण करने में भी सफलता मिली है। प्रति एकड़ में बाबा का एक एक झण्डा लगाने से भी हर बात में बाबा की मदद का अनुभव होता है। यौगिक खेती की फसल से जो भूसा निकलता है उसे पशुओं को खिलाने से दूध उत्पादन में भी वृद्धि देखी गयी है। हमारी एक गाय पहले प्रतिदिन ३–४ लीटर दूध देती थी लेकिन जब उसे यौगिक भूसा खिलाने लगे तो वही प्रतिदिन ५–६ लीटर दूध देने लगी। फिर देखा कि योग के प्रयोग से अतिवृष्टि एवं अनावृष्टि दोनों परिस्थितियों में अच्छी फसल होती है और कम खर्च बालानशीन भी होता है। पशु–पंछी भी हमारे मन की बातें सुनते–समझते हुए देखे जाते हैं।

मैं ७ साल से ईश्वरीय ज्ञान मार्ग में हूँ और २ साल से ग्रामविकास प्रभाग के अन्तर्गत शाश्वत यौगिक खेती अभियान के सम्पर्क में आया। पूरी जानकारी प्राप्त करने के बाद परम कृषक परमपिता शिवबाबा पर सम्पूर्ण निश्चय रख यौगिक पद्धति से खेती करना शुरू कर दी। इस दौरान खेती में बहुत ही अनूठे अनुभव प्राप्त किये, परंतु समस्यायें भी विकराल रूप में आई लेकिन प्यारे शिवबाबा की मदद और निश्चय ने मुझे विजय दिला दिया। मुझे यह निश्चय तो था ही कि यौगिक खेती शुभ संकल्पों की खेती है, शुद्ध भावनाओं की खेती है और हमारे संकल्पों को प्रकृति सबसे अधिक ग्रहण करती है। धमतरी जिले की प्रमुख फसल धान है। इस वर्ष प्रकृति ने भी जैसेकि किसानों से मुख मोड़ लिया क्योंकि बारिश बहुत कम हुई, सारी फसल चौपट हो गई जिसके कारण किसान आत्महत्या भी कर रहे हैं क्योंकि लागत के अनुरूप प्राप्ति नहीं हुई।

मुझे यह बताते हुए बहुत हर्ष हो रहा है कि मैंने बहुत कम लागत में ३ एकड़ भूमि में 'शाश्वत यौगिक खेती' का प्रयोग किया। डेढ़ एकड़ के प्लॉट में पिछले वर्ष से १० क्विंटल अधिक उत्पादन प्राप्त किया। दूसरे डेढ़ एकड़ के प्लॉट में पानी की कमी के कारण फसल अधिक नहीं रही परन्तु दूसरे किसानों के बराबर जरूर रही। कृषि के दौरान मेरे अनुभव निम्न बिन्दुओं में है।

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**ग्रंथपाल** – तुम्ही हल्ली खांडेकरांच्या कादंबऱ्याच नेहमी नेता. ते तुमचे आवडते लेखक वाटतं?

**वाचक** – मुळीच नाही. एकदा त्यांच्या कादंबरीत मला दहा रूपयाची नोट सापडली तेव्हापासून त्यांचीच पुस्तकं घरी नेऊन मी चाळतो.

## रविंद्रनाथ टागोरांच्या कविता

(मूळ इंग्रजीत)

सौंदर्याची जादू त्याच्या विनयशीलतेत आहे
त्यास आपले सर्वस्व द्यावे किंवा न द्यावे
सौंदर्य कशाचीच अपेक्षा करीत नाही



**मूळ इंग्रजी कविता – रविंद्रनाथ टागोर**
**मराठी अनुवाद – अरविंद ब्राम्हणे,**
भिंगार मो. ९४०३७३४२८१

# स्त्री स्वास्थ्याचे कानमंत्र आरोग्य सखी

अभिनय, देखणे रूप, संपत्ती, प्रसिद्धी सगळं तिच्याकडे होते. असे असताना कुठलाच विचार न करता हे कृत्य केले ते केवळ नैराश्यावस्थेतच. आपण जीवनामध्ये अशी कितीतरी उदाहरणे बघतो. जर सारखे यश मिळत राहिले व काही कारणास्तव नंतर अपयश आले तर ते पचवण्याची ताकद बऱ्याचशा स्त्रियांमध्ये नसते. पण जीवन म्हणजे सुख आणि दु:ख यांचा संगम होय. सुखानंतर दु:ख येतेच. दु:ख आल्यानंतर काही दिवसांतच सुखाचे क्षण अनुभवावयास मिळतात. सुख आणि दु:ख एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. जो दु:खाचे क्षण संघर्ष करून पार पाडू शकतो, तो जीवनात यशस्वी होतो. नैराश्य किंवा डिप्रेशन हे वादळासारखे प्रत्येकाच्या आयुष्यामध्ये येते. बऱ्याच वेळेला आपण स्वप्न रंगवतो. परंतु स्वप्नातील जीवन व सत्य यांमध्ये तफावत असते. बरेचदा आपण रंगवलेले स्वप्न प्रत्यक्षात उतरत नाही. आपल्याला हवी असलेली गोष्ट मिळत नाही. अशा वेळी पदरी निराशा येते. संवेदनशील, मृदू व हळव्या स्वभावाच्या स्त्रिया नैराश्याने लवकर ग्रासल्या जातात.

प्रेमभंग, परीक्षेतील अपयश, जीवनातील चढउतार, जवळच्या व्यक्तीचे अकस्मात निधन, कौटुंबिक वादविवाद, नोकरी–व्यवसायाच्या ठिकाणी सहकाऱ्यांशी असणारे मतभेद, घटस्फोट, जुनाट आजार, गर्भनिरोधक गोळ्यांचा अतिवापर या कारणांमुळे भावनाप्रधान आणि संवेदनशील स्त्रिया लवकर बळी पडतात. प्रत्येकाच्याच आयुष्यात चढ–उतार येत असतात. मात्र काही स्त्रिया कठीण प्रसंगाला धैर्याने तोंड देतात; तर हळव्या स्वभावाची स्त्री मनावर आलेला ताण सहन करू शकत नाही. या अवस्थेत मन सतत कुठल्या तरी विचारांमध्ये गुंतलेले असते. विचारचक्र चालू असते. काहीजणी एखाद्या घटनेमुळे दु:खी होतात. परंतु त्यावर मात करून जीवनामध्ये आनंद शोधण्याचा प्रयत्न करतात. अशा वेळी नैराश्य तात्पुरते असते. जवळचे मित्रमैत्रीण, नातेवाईक यांच्या समजावून सांगण्याने, प्रेमाच्या, आपुलकीच्या बोलण्याने त्यावर मात करता येते. परंतु काही स्त्रियांच्या बाबतीत एखाद्या घटनेचा मनावर खोलवर परिणाम होतो. ती घटना म्हणजेच जीवन असे त्या समजतात. त्यामुळे आयुष्यात अर्थच उरला नाही, जीवन निरर्थक आहे, कशासाठी जगायचे, असे त्यांना वाटते आणि त्या आत्महत्येचा प्रयत्न करतात.

(क्रमश:)

**– डॉ. शारदा निर्मळ–महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहमदनगर
मोबाईल नं– ८७९३४००४००

# अहमदनगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनच्या कार्याची दखल देशपातळीवर घेतली जात आहे

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन, मॅगो ब्लड डोनेशन कॅम्प २०२४

नगर – समाजामध्ये आपण काम करीत असताना समाजाचे काहीतरी देणे लागते या भावनेतून अहमदनगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशन जिल्हास्तरावर मॅगो ब्लड डोनेशन कॅम्पचे आयोजन करीत आपले कर्तव्य पार पडत असतात विचार हा सकारात्मक असला पाहिजे, त्यातून चांगले उपक्रम राबवले जातात, रक्तदान शिबिरे ही काळाची गरज असून गरजू रुग्णांपर्यंत मदतीचा हात पोहोचला जातो, नगर शहर हे जिल्ह्याचे ठिकाण असून या ठिकाणी आरोग्य सुविधा उपलब्ध असल्यामुळे ग्रामीण भागातील रुग्ण मोठ्या संख्येने उपचार घेण्यासाठी येत असतात यावेळी रक्ताची आवश्यकता पडते या रक्तदान शिबिराचा उपयोग नक्कीच गरजू रुग्णांना होईल, नगर मोबाईल असोसिएशनचे सामाजिक कार्य राज्यस्तरावर असून त्याची दखल देशपातळीवर घेतली जात आहे, असे प्रतिपादन आ. संग्राम जगताप यांनी केले




अहमदनगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनतर्फे टिळकरोडवरील नंदनवन लॉन येथे आयोजित ब्लड डोनेशन कॅम्पचे उद्‌घाटन प्रसंगी रक्तदान करताना आ. संग्राम जगताप. समवेत जिल्हा पोलिस अधीक्षक राकेश ओला, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ आदी. (छाया– लहू दळवी)

टिळक रोड नंदनवन लॉन येथे अहमदनगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनच्या वतीने ब्लड डोनेशन कॅम्प २०२४ चे उद्घाटन आ. संग्राम जगताप व जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ यांच्या हस्ते झाले.

यावेळी जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, महाराष्ट्र मोबाईल रिटेलर्स असोसिएशनचे अध्यक्ष अजित जगताप, जिल्हाध्यक्ष अजित पवार, गणेश भोसले, अविनाश घुले, प्रा. माणिकराव विधाते, संजय चोपडा, विकि जगताप, गिरीश अग्रवाल, कमलेश भिंगारवाला, यश मेहता, रितेश सोनीमंडलेचा, सतीश लोढा, सुदाम वाडेकर, श्रीपाल ओहस, प्रकाश भागानगरे, दगडू मामा पवार, संभा पवार, अमित बुरा, गोरख पडोळे, अतुल रच्चा, मनीष चोपडा, संजय जाधव, संतोष बलदोटा, रितेश सोनीमंडलेचा, साजिद खान, हिरा खूबचंदानी, प्रितम तोडकर, राहूल सोनीमंडलेचा आदींसह पदाधिकारी सदस्य उपस्थित होते

जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ म्हणाले की, असोसिएशनचा रक्तदान शिबिराचा उपक्रम सकारात्मक आहे, जिल्हाभरातील मोबाईल व्यावसायिक एकत्र येऊन समाजासाठी आरोग्यदायी उपक्रम राबवत युवकांमध्ये ऊर्जा व प्रेरणा देणारा आहे असे ते म्हणाले

अजित जगताप म्हणाले की, असोसिएशनच्या वतीने गेल्या पाच वर्षापासून कै. भावेश सोलंकी यांच्या स्मरणार्थ रक्तदान शिबिर घेतले जात आहे, आता या शिबिराला मोठे स्वरूप प्राप्त झाले असून जिल्हाभरातील सुमारे ३ हजार ५०० मोबाईल व्यावसायिक व ग्राहक रक्तदान करत असतात, समाजामध्ये रुग्णांना मोठ्या प्रमाणात रक्ताची आवश्यकता भासत असते, त्यांना तातडीने रक्त उपलब्ध व्हावे यासाठी असोसिएशन एक दिवस आपले दुकान बंद ठेवून रक्तदान शिबिरामध्ये भाग घेत असतात या रक्ताचा उपयोग डायलेसिस, थैलासीमिया व शस्त्रक्रिया करणाऱ्या रुग्णांना होईल संग्राम भैय्या सोशल फाउंडेशन यांचे मोलाचे सहकार्य लाभत असते असे ते म्हणाले

दरम्यान जिल्हा पोलीस अधीक्षक राकेश ओला आणि उद्योजक नरेंद्र फिरोदिया यांनी मनोगत व्यक्त करीत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रसाद बेडेकर यांनी केले तर आभार प्रदर्शन अजित पवार यांनी केले

अहमदनगर मोबाईल रिटेलर्स असोसिएशनच्या वतीने आयोजित मॅगो ब्लड डोनेशन कॅम्प मध्ये आ. संग्राम जगताप, जिल्हाधिकारी सिद्धाराम सालीमठ, पोलीस अधीक्षक राकेश ओला यांनी रक्तदान करत सामाजिक उपक्रमाला प्रोत्साहन दिले. रक्तदान करण्यासाठी शहरातील सर्व रक्तपिढ्यांना निमंत्रित करण्यात आले होते. यामध्ये मोबाईल व्यावसायिक, ग्राहक व महिलांनी सहभाग घेत सुमारे ३ हजार ५०० रक्त पिशव्यांचे संकलन झाले अशी माहिती अजित जगताप यांनी दिली.



## बी.सी.एफ.आय. संस्थेच्यावतीने मोहरमनिमित्त सरबत वाटप

बज्म ए चिरागे फकीर चिश्ती इंटरनॅशनल (बी.सी.एफ.आय.) संस्थेच्यावतीने मोहरमनिमित्त मंगलगेट येथे भाविकांना सरबतचे वाटप करण्यात आले. सज्जादा नशीन हजरत सय्यद मोहसीन अली शाह चिश्ती यांच्या मार्गदर्शनाखाली दरवर्षी सरबत वाटपाचा उपक्रम केला जातो. प्रारंभी सामुदायिक प्रार्थना करुन सरबत वाटपला प्रारंभ करण्यात आले. यावेळी बी.सी.एफ.आय. संस्थेचे सदस्य.

# धनादेश अनादर प्रकरणी दोघांना एक महिना सश्रम कारावास व २ लाख २० हजार रुपये दंड

नगर – धनादेशाचा अनादर प्रकरणी सर्वश्री टेक्नोग्रीन प्रा. लिमिटेडचे संचालक सुजितकुमार संभाजी पोटे यांच्या फिर्यादीवरून नगर येथील प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी मुंब्रा, शिळफाटा (ठाणे) येथील स्प्रिंगमॅनअ‍ॅप्रीअलप्रा. लिमिटेडचे संचालक हैदर कासिम सईद व सुमनकुमार साहा यांना एक महिना सश्रम कारावास व २,२०,००० रूपये दंडाची शिक्षा सुनावली आहे.

हैदर कासिम सईद व सुमनकुमार साहा यांनी दि.२५ डिसेंबर २०२१ रोजी १ लाख ८५ हजार ८२६ रूपयांचा धनादेश दिला होता. मात्र हा धनादेश अनादरीत झाला. त्यामुळे फिर्यादी सुजितकुमार संभाजी पोटे (संचालक, सर्वश्री टेक्नोग्रीन प्रा. लिमिटेड) यांनी मो.अ. हुसेन (अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी (कोर्ट क्र.१४) यांना न्यायालयात विधीतज्ज्ञ अ‍ॅड. संजय ठाणेकर यांच्यामार्फत हैदर कासिम सईद व सुमनकुमार साहा यांच्या विरोधात प्रकरण दाखल केले होते.

प्रकरणात सबळ पुरावे, उभय बाजूंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर व न्याय निवाड्याचे अवलोकन करून अतिरिक्त न्यायदंडाधिकारी कोर्ट क्रमांक १४ च्या मो.अ. हुसेन यांनी १० जुलै २०२४ रोजी हैदर कासिम सईद व सुमनकुमार साहा यांना एक महिना सश्रम कारावास व २ लाख २० हजार रूपये नुकसान भरपाईची शिक्षा ठोठावली. वादी पक्षातर्फे अ‍ॅड. संजय ठाणेकर व त्यांचे सहाय्यक अ‍ॅड. यशवंत क्षीरसागर यांनी काम पाहिले.



मोहरमनिमित्त बारा इमाम कोठला येथे हिंदू–मुस्लिम बांधवांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. भंडारा वाटपाचा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संपत बारस्कर, सागर बोरुडे ट्रस्टचे विश्वस्त दस्तगीर सय्यद जहागीरदार, सादिक सय्यद, निसार सय्यद, निहाल सय्यद, आरिफ सय्यद, जिशान जहागिरदार, हसैन सय्यद, अदनान सय्यद, साहेबान जहागिरदार, असेल सय्यद, शहबाज बॉक्सर आदी. (छाया – बबलू शेख)

# बारा इमाम कोठला येथे हिंदू–मुस्लिम बांधवांसाठी भंडारा

नगर – मोहरमनिमित्त बारा इमाम कोठला येथे हिंदू–मुस्लिम बांधवांसाठी भंडाऱ्याचे आयोजन करण्यात आले होते. भंडारा वाटपाचा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी संपत बारस्कर, डॉ. सागर बोरुडे, ट्रस्टचे विश्वस्त दस्तगीर सय्यद जहागिरदार, सादिक सय्यद, निसार सय्यद, निहाल सय्यद, सय्यद जुबेर, मुजावर रफा सय्यद, खालीद सय्यद, आरिफ सय्यद, जिशान जहागिरदार, हसैन सय्यद, अदनान सय्यद, साहेबान जहागिरदार, असेल सय्यद, शहबाज बॉक्सर आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना आ. संग्राम जगताप म्हणाले की, कोठला येथे मागील दशकापासून ट्रस्टच्या वतीने भंडारा वाटपाचे आयोजन केले जाते. या भंडाऱ्याचा हिंदू–मुस्लिम बांधव हजारोंच्या संख्येने लाभ घेतात. ट्रस्टचे काम अत्यंत चांगले असून, सर्वांना बरोबर घेऊन ट्रस्ट काम करीत आहे, असे ते म्हणाले.

ट्रस्टने ५०० किलोचा भंडारा आयोजित केला होता. याचा सगळ्यांनी लाभ घेतला. अन्नधान्य सर्वश्रेष्ठ दान असते व सरबत वाटप करण्यात आले. नगर जिल्ह्यातून व महाराष्ट्रातून येणारे भाविकांना अन्नदानाचा चांगला लाभ मिळाला. वायफळ खर्च न करता भाविकांसाठी सर्वतोपरी मदत करण्याचा ट्रस्टचा मानस आहे. याचा आदर्श यंग पार्टी व सोशल क्लबने घ्यावा.

यावेळी बोलताना दस्तगीर बडेसाहेब जहागिरदार म्हणाले, परंपरेनुसार भंडारा आयोजित करण्यात येत आहे. ट्रस्टच्या वतीने आयोजित भंडाऱ्याचा लाभ सर्व जाती–धर्माचे लोक घेतात. आमची पाचवी पिढी ट्रस्टच्या माध्यमातून विविध कामे करीत आहे. कोठला परिसरात आणि असेच चालू राहणार आहे. सामाजिक काम आहे, असे दस्तगीर म्हणाले.

# विधाते विद्यालयाच्या विद्यार्थ्यांचा सारसनगरला रंगला दिंडी सोहळा

## पारंपारिक वाद्यांचा गजर, टाळ–मृदूंगाचा निनाद व जय हरी विठ्ठलाच्या घोषाने नागरिक भारावले

नगर – कै. दामोधर विधाते (मास्तर) प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशीनिमित्त सारसनगर भागातून उत्साहात दिंडी काढली. बाल वारकऱ्यांच्या दिंडीत श्री विठ्ठल–रुक्मिणी व विविध संत व वारकऱ्यांच्या वेशभूषेत सहभागी झालेल्या विद्यार्थी सर्वांचे आकर्षण ठरले.



कै. दामोधर विधाते (मास्तर) प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात पारंपारीक वाद्याचा गजर, टाळ–मृदंगाचा निनाद व विठ्ठलाच्या घोषात आषाढी एकादशी साजरी करताना फुंगड्यांमध्ये रंगलेल्या विद्यार्थिनी.

पारंपारिक वाद्यांच्या गजरात व लेझीम, झांज पथकासह दिंडी काढण्यात आली होती. पांढरी टोपी, कपाळी गंध, पायजमा, बंडी या पोशाखातील लहान मुले, तर रंगीबेरंगी साड्या परिधान करुन मुली डोक्यावर तुलसी वृंदावन घेऊन दिंडीत सहभागी झाल्या होत्या. टाळच्या गजरात ज्ञानोबा... तुकाराम... च्या जयघोषाने परिसर निनादला.

संस्थेचे सरचिटणीस प्रा. शिवाजीराव विधाते यांच्या हस्ते पालखीचे पूजन करुन दिंडीला प्रारंभ करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक शिवाजी म्हस्के, संतोष सुसे, शिक्षक सविता सोनवणे, लता म्हस्के, निता जावळे, मीनाक्षी घोलप, सारिका गायकवाड, श्रीमती पेंटा, राधाकिसन क्षीरसागर, योगेश दरवडे, भाऊसाहेब पुंड, अमोल मेहेत्रे, सचिन बर्डे आदींसह विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

सारसनगर भागातील प्रमुख मार्गावरुन या दिंडीचे मार्गक्रमण झाले. दिंडी पाहण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती. या लहान वारकऱ्यांचे परिसरात उत्साहात स्वागत करण्यात आले. मुलींनी दिंडीत फुगड्यांचा फेर धरला होता. शाळेत विद्यार्थ्यांचा नियोजनबध्द रिंगण सोहळा पार पडला. यावेळी हातात भगवे ध्वज घेऊन विद्यार्थी धावले.

प्रा. शिवाजीराव विधाते म्हणाले की, विद्यार्थ्यांमध्ये दिंडीच्या माध्यमातून आपली संस्कृती जोपसण्याचे कार्य होत आहे. अशीच परंपरा कायम ठेऊन विद्यार्थ्यांना संस्कारक्षम शिक्षण दिले जात आहे. बाल वारकऱ्यांची दिंडी पाहून पंढरपूरला आल्याचा भास निर्माण झाल्याचे त्यांनी सांगितले.



पारगाव येथील डॉ. शरद कोलते स्कुलमध्ये आषाढी एकदशीनिमित्त दिंडी प्रदक्षिणामध्ये सहभागी झालेले विद्यार्थी. समवेत सचिव विजय शिंदे, सुनीता सातपुते, स्वाती वायकर, तमन्ना शेख, किर्ती मगर, ईश्वर तनपुरे, स्नेहल गुंड आदी.

# डॉ. शरद कोलते स्कुलमध्ये आषाढी एकादशी निमित्त दिंडी प्रदक्षिणा

नगर – पारगाव येथील डॉ. शरद कोलते स्कुल मध्ये आषाढी एकादशी निमित्त दिंडी प्रदक्षिणा काढण्यात आली होती. या वेळी विद्यार्थ्यांनी वारकरी पंथाच्या पद्धतीने वेशभूषा केलेली होती. विद्यार्थ्यांनी गावातील रस्त्यावरुन दिंडी प्रदक्षिणा काढून शेवटी विठ्ठल मंदिरात जाऊन विविध भजन गायिले. त्याचबरोबर बेटी पढाव बेटी बचाव, झाडे लावा झाडे जगवा, पाणी आडवा पाणी जिरवा अशा सामाजिक आशयाच्या घोषणा देऊन जनजागृती देखील केली.

यावेळी संस्थेचे सचिव विजय शिंदे यांनी मनोगत व्यक्त केले त्यात ते म्हणाले कि अशा दिंडी प्रदक्षिणा मुळे मुलांच्या मनामध्ये अध्यात्मिक वातावरण निर्मिती होते. ज्यामुळे त्यांना भविष्यात देखील फायदा होऊ शकतो. सध्याच्या ताणतणावाच्या काळात असे क्षण मनाला जास्त प्रफुल्लित करतात व मन आनंदी राहण्यास मदत करतात. गावातील भजनी मंडळी देखील या प्रदक्षिणेत सहभागी झाले होते.

दिंडी प्रदक्षिणेचे नियोजन सुनीता तनपुरे, स्वाती वायकर, तमन्ना शेख, किर्ती मगर, ईश्वर तनपुरे, स्नेहल गुंड यांनी केले.




किड्स सेकंड होम स्कुलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात साजरी करण्यात आली. विद्यार्थ्यांनी यावेळी ज्ञानबा तुकाराम म्हणत दिंडी काढली. वारकऱ्यांच्या वेषभूषेत असलेल्या विद्यार्थ्यांचे सर्वांनी कौतुक केले.

# किड्स सेकंड होम स्कुलमध्ये आषाढी एकादशी साजरी

नगर – बोल्हेगाव येथील किड्स सेकंड होम स्कुलच्या विद्यार्थ्यांनी आषाढी एकादशी निमित्त मोठ्या उत्साहात बोल्हेगाव उपनगरातून दिंडी काढून स्वछतेचा संदेश दिला. ही दिंडी विविध भागातून मार्गक्रमण करताना दिंडी पाहण्यासाठी आलेल्या नागरिकांना स्वच्छतेचे आवाहन करण्यात आले.

ज्ञानबा तुकाराम, विठ्ठल माझा मी विठ्ठलाचा, या भक्तीगीतांमध्ये तल्लीन होऊन विठ्ठल नामाच्या जय घोषात, टाळ– मृदंगाच्या गजरात दिंडी निघाली होती. दिंडीत विद्यार्थी वारकरींच्या वेशभूषेत तर विद्यार्थिनी डोक्यावर तुलस घेऊन सहभागी झाल्या होत्या.

भगवे ध्वज, टाळ, मृदूंग व वीणा हातात घेऊन बाल वारकऱ्यांनी केलेल्या विठ्ठल नामाच्या गजराने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. विठ्ठल–रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, मीराबाई, मुक्ताबाई व संत तुकारामांच्या वेशभूषा परिधान केलेले लहान विद्यार्थी दिंडीचे आकर्षण ठरले.

संस्थेचे अध्यक्ष श्रीनिवास बोज्जा यांच्या हस्ते दिंडीतील पालखीचे पूजन करुन या सोहळ्याला प्रारंभ झाला. यावेळी सचिव डॉ. लक्ष्मीकांत पारगावकर, उपाध्यक्ष चंद्रकांत रोहकले, कोषध्यक्ष संदीप गांगर्डे मुख्याध्यापिका व शिक्षकवृंद आदी उवस्थित होते.

परिसरातील विठ्ठल मंदिर समोर विद्यार्थ्यांनी केलेल्या रिंगण सोहळ्यांनी उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फिटले.

यावेळी विद्यार्थिनी व शिक्षिकांनी फुगड्यांचा फेर धरला होता. दिंडीतील पालखीचे चौका चौकात स्वागत करण्यात आले. गांधी चौक येथून मार्गक्रमण करत गणेश नगर, बोल्हेगाव असे फिरून शाळेच्या आवारात दिंडीचा समारोप करण्यात आला.

यावेळी विद्यार्थ्यांची दिंडी पहाण्यासाठी परिसरातील नागरिकांनी गर्दी केली होती.

# लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाचा दिंडी सोहळा उत्साहात

## घोड्यांच्या रथामधील स्वार विठ्ठल, रुक्मिणी व संतांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष

नगर – रयत शिक्षण संस्थेच्या कापड बाजार येथील लक्ष्मीबाई भाऊराव पाटील प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त बाल वारकरी दिंडी सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. हातात भगवे ध्वज, टाळ–मृदूंगाचा निनाद, जय हरी विठ्ठल, ज्ञानोबा–तुकोबांचा जयघोष करीत बाल वारकऱ्यांनी शहरातून दिंडी काढली.



शहरात लक्ष्मीबाई भाऊराव पाटील विद्यालयाचा दिंडी सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी घोड्यांच्या रथामधील स्वार विठ्ठल, रुक्मिणी व संतांच्या वेशभूषेतील विद्यार्थ्यांनी वेधले लक्ष वेधले.

विठ्ठल, रुक्मिणी व संतांची वेशभूषा करून घोड्यांच्या रथात स्वार झालेल्या बाल वारकऱ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

ज्ञानोबा... तुकाराम... च्या जयघोषाने शहरातील परिसर बाल दिंडीने निनादला. पांढरी टोपी, कपाळी गंध, पायजमा, बंडी या पोशाखातील लहान मुले, तर रंगीबेरंगी साड्या परिधान करुन मुलीं दिंडीत सहभागी झाल्या होत्या. हातात टाळ घेऊन विद्यार्थ्यांनी जय हरी विठ्ठलाचा घोष केला. तर मुलींनी फुगड्यांचा फेर धरला होता. ठिकठिकाणी नागरिकांनी बाल वारकऱ्यांचे स्वागत करुन कौतुक केले. कापड बाजार, नवी पेठ व अर्बन बँक मार्गे दिंडी पुन्हा शाळेत पोहचली. शाळेच्या प्रांगणात अभंग, गवळण, कीर्तन, भारुड, भक्ती गीतांसह विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.

बालदिंडीसाठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक शिवाजी लंके व माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका छायाताई काकडे यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेत पालक, विद्यार्थी व शिक्षकांनी पंगतीत बसून साबुदाणा खिचडी, फराळाचा एकत्र आस्वाद घेतला. दिंडीचे संचलन प्रदीप पालवे यांनी केले. दिंडी सोहळा यशस्वी करण्यासाठी प्राथमिक व माध्यमिक विद्यालयातील सर्व शिक्षिक, शिक्षिका यांनी परिश्रम घेतले.

# अहमदनगर प्रज्ञाशोध परीक्षेची नावनोंदणी सुरू

नगर – अहमदनगर जिल्ह्यातील शिक्षण क्षेत्रात सुपरिचित असलेली अहमदनगर प्रज्ञा शोध परीक्षा २०२५ ची ऑनलाईन नावनोंदणी सुरु झालेली आहे. ही परीक्षा १९ जानेवारी २०२५ रोजी इयत्ता ४ थी व इयत्ता ७ वी च्या मराठी व इंग्रजी माध्यमांसाठी जिल्ह्यातील विविध केंद्रांवर घेतली जाणार आहे. ऑनलाईन नावनोंदणी, परीक्षेचे वेळापत्रक, अभ्यासक्रम व परीक्षेचे स्वरूप याविषयीची माहिती या www.vpahmednagar.in वेबसाईटवर उपलब्ध आहे. तरी जिल्ह्यातील सर्व शाळांचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थ्यांनी प्रस्तुत परीक्षेसाठी ऑनलाईन पद्धतीने किंवा महाविद्यालयात प्रत्यक्ष अर्ज सादर करून नावनोंदणी निश्चित करावी. नावनोंदणीची अंतिम तारीख विलंब शुल्कासह ३० नोव्हेंबर असणार आहे. (महाविद्यालयात सकाळी १० ते दु. ४ या कार्यालयीन वेळेत नावनोंदणी करणे अपेक्षित आहे.) आपणास अडचण असल्यास कार्यालयीन वेळेत (सकाळी १० ते दुपारी ४) संपर्क क्र. ०२४१–२५५१४२०, ८७६७८८८७४३ वर संपर्क साधावा, असे आवाहन संचालक व प्राचार्य डॉ. रवींद्र मा. चोभे, सहाय्यक परीक्षा नियंत्रक प्रा. डॉ. अमरनाथ शां. कुमावत, परीक्षा नियंत्रक डॉ. अविनाश ओं. भांडारकर यांनी केले आहे.

अहमदनगर प्रज्ञाशोध परीक्षा १९ जानेवारी २०२५ अशी असणार आहे. याची सर्वांनी नोंद घ्यावी.



जिल्हा माध्यमिक शिक्षक बँकेच्या नूतन चेअरमनपदी बाळू सरोदे तर व्हा. चेअरमनपदी रमेश गोरे यांची निवड झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना रामेश्वर चोपडे, निर्गुणा बांगर, संदीप मोटे, कैलास सारोक्ते, भाऊराव राहींज, महेंद्र भणभणे, सूर्यकांत काळे, संचालक मंडळातील इतर सदस्य.

# प्राथमिक शिक्षक बँकेच्या चेअरमनपदी बाळू सरोदे तर व्हा. चेअरमनपदी रमेश गोरे

नगर – जिल्हा प्राथमिक शिक्षक बँकेची सभा संचालक मंडळ सभागृहात झाली. उपनिबंधक सहकारी संस्था शुभांगी गोंड यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. यावेळी चेअरमन पदासाठी बाळू सरोदे व कारभारी बाबर यांनी अर्ज दाखल केले. व्हाईस चेअरमन पदासाठी रमेश गोरे व कल्याण लवांडे यांनी उमेदवारी अर्ज दाखल झाल्यानंतर मतदान प्रक्रिया पार पडली. चेअरमन पदासाठी बाळू सरोदे यांना १२ मतं पडली, व्हाईस चेअरमन पदासाठी रमेश गोरे यांना १२ मते पडली. एक मतदान चेअरमन पदासाठी बाद झाले

यावेळी संचालक रामेश्वर चोपडे, निर्गुणा बांगर, संदीप मोटे, कैलास सारोक्ते, भाऊराव राहींज, महेंद्र भणभणे, सूर्यकांत काळे, शशिकांत जेजुरकर, योगेश वाघमारे, संतोषकुमार राऊत, कल्याण लवांडे, गोरक्षनाथ विटनोर, अण्णासाहेब आभाळे, बाळासाहेब तापकीर, माणिक कदम, शिवाजी कराड, सरस्वती घुले, कारभारी बाबर, ज्ञानेश्वर शिरसाठ, मुख्य कार्यकारी अधिकारी दिलीप मुरदारे आदी उपस्थित होते.

# अहमदनगर जिल्हा परिषद कर्मचारी सोसायटीच्या तज्ञ संचालकपदी संभाजी आव्हाड व प्रशांत निमसे





नगर – अहमदनगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस को ऑप क्रेडीट सोसायटीच्या तज्ञ संचालक पदी (स्वीकृत) शेवगाव तालुक्यातील ढोरजळगांव प्राथमिक आरोग्य केंद्रातील आरोग्य सहाय्यक संभाजी किसन आव्हाड व सा.बां.उपविभाग पंचायत समिती, पारनेर येथील कनिष्ठ सहाय्यक प्रशांत भास्कर निमसे यांची निवड करण्यात आली आहे.

अहमदनगर जिल्हा परिषद सर्व्हन्टस को. ऑप. क्रेडीट सोसायटीच्या संचालक मंडळाची मासिक सभा नुकतीच संस्थेच्या कार्यालयात चेअरमन योगेंद्र पालवे यांच्या अध्यक्षते खाली झाली. या सभेत पॅनल प्रमुख संजय कडूस यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० नुसार संस्थेच्या सभासदांमधून २ तज्ञ संचालक नियुक्त करण्याची तरतूद असून त्यानुसार नूतन तज्ञ संचालकांची नियुक्ती करावी अशी सूचना मांडली. त्यास उपस्थित सर्व संचालकांनी सहमती दर्शवित एकमताने संभाजी आव्हाड व प्रशांत निमसे यांची निवड केली.सदर प्रसंगी चेअरमन योगेंद्र पालवे, व्हा चेअरमन डॉ. दतात्रय डांगे, सर्व संचालक यांनी स्वीकृत संचालकांचे अभिनंदन केले.

या प्रसंगी संचालक प्रशांत मोरे, विक्रम ससे, विलास शेळके, अरुण जोर्वेकर, भाऊसाहेब चांदणे, इंजि. राजू दिघे, चंद्रकांत संसारे, ऋषिकेश बनकर, स्वप्नील शिंदे, कल्याण मुटकुळे, सुधीर खेडकर, श्रीकांत देशमाने, काशिनाथ नरोडे, कैलास डावरे, अर्जुन मंडलिक, संचालिका श्रीमती ज्योती पवार, श्रीमती सुरेखा महारनूर, श्रीमती मनीषा साळवे, व्यवस्थापक राजेंद्र पवार, उपव्यवस्थापक प्रशांत लोखंडे सभासद उपस्थित होते.

## आषाढी एकादशी हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा उत्सव

### प्रा. अनुरीता झगडे यांचे प्रतिपादन : मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशी उत्साहात

नगर – आषाढी एकादशी हा महाराष्ट्रातील सर्वात मोठा उत्सव आहे. या उत्सवात लहान–मोठे असे सर्वजण सहभागी होतात. आषाढी एकादशीच्या कार्यक्रमात मोठ्या उत्साहाने व भक्ती भावाने शाळेतील विद्यार्थी सहभागी होत असतात. विद्यार्थ्यांना महाराष्ट्राची संस्कृती परंपरा याची माहिती व्हावी. यासाठी दरवर्षी दिंडीचे आयोजन करण्यात येते, असे प्रतिपादन मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा. अनुरीता झगडे यांनी केले आहे.

सालाबाद प्रमाणे हिंदसेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये आषाढी एकादशी निमित्त शाळेचे चेअरमन जगदीश झालानी यांच्या मार्गदर्शनानुसार दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या दिंडीमध्ये विद्यार्थ्यांनी श्री विठ्ठल, रुक्मिणी, वारकरी, संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, मुक्ताई अशा विविध वेशभूषा करून सहभाग नोंदविला.

याप्रसंगी दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई, हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अजित बोरा, मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा.अनुरीता झगडे आदींसह शाळेतील सर्व शिक्षिका शिक्षकेतर कर्मचारी आदी उपस्थित होते.



आषाढी एकादशी निमित्त मेहेर इंग्लिश स्कूलमध्ये विद्यार्थ्यांनी विठ्ठल,रुक्मिणी,संत ज्ञानेश्वर संत तुकाराम, मुक्ताई, वारकरी आकर्षक वेशभूषा केल्या होत्या.





केडगाव मधील राजश्री शाहू बालक मंदिरच्यावतीने आषाढी एकादशीनिमित्त दिंडीतील विद्यार्थ्यांनी रिंगण तयार केले होते. दुसऱ्या छायाचित्रात मुख्याध्यापिका आर.व्ही.म्हस्के, एम.एम. जगदाळे, के.के. भोर आदी शिक्षक वर्ग.

# केडगावात रंगली राजर्षी शाहू बालक मंदिरच्या विद्यार्थ्यांची दिंडी

नगर – केडगाव येथील राजर्षी शाहू शिक्षण प्रसारक मंडळाचे राजर्षी शाहू बालक मंदिर प्राथमिक व माध्यमिक विद्यालयाच्या वतीने आषाढी एकादशीनिमित्त दिंडी काढण्यात आली होती. दिंडीत बाल वारकरी उत्साहात सहभागी झाले होते.

संस्थेचे सचिव बबनराव कोतकर व खजिनदार प्रल्हाद साठे यांच्या हस्ते आरती करून दिंडीला प्रारंभ करण्यात आला. हातात भगवे ध्वज, टाळ–मृदूंगचा निनाद, जय हरी विठ्ठल, ज्ञानोबा–तुकोबांचा जयघोष करीत बाल वारकऱ्यांनी शाळे पासून ते शाहूनगर बस स्टॉप पर्यंत दिंडी काढली. विठ्ठल, रुक्मिणी व संतांच्या वेशभूषेत घोड्यांच्या रथात स्वार झालेल्या विद्यार्थ्यांनी सर्वांचे लक्ष वेधले.

बाल वारकऱ्यांनी केलेल्या ज्ञानोबा... तुकाराम...च्या गजराने केडगाव परिसर दणाणला. पांढरी टोपी, कपाळी गंध, पायजमा, बंडी या पोशाखातील लहान मुले, तर रंगीबेरंगी साड्या परिधान करुन मुलीं दिंडीत सहभागी झाल्या होत्या. हातात टाळ घेऊन विद्यार्थ्यांनी जय हरी विठ्ठलाचा घोष केला. तर मुलींनी फुगड्यांचा फेर धरला होता. ठिकठिकाणी नागरिकांनी दिंडीचे स्वागत करुन कौतुक केले. शाळेच्या प्रांगणात अभंग, गवळण, कीर्तन, भारुड, भक्ती गीतांसह विद्यार्थ्यांचा सांस्कृतिक कार्यक्रम पार पडला.

बालदिंडीसाठी प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका आर. व्ही. म्हस्के याचे मार्गदर्शन लाभले.

यावेळी एम.एस. जगदाळे, के.के. भोर, एस.एन. काकडे, वाय.बी. काळे, एस.के. करांडे, ए.एस. सोनवणे आदींसह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व पालक उपस्थित होते.

# विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राच्या परंपरेचे पाईक व्हावे

### अनंत देसाई यांचे प्रतिपादन

नगर – दिंडी ही महाराष्ट्राची प्राचीन परंपरा आहे. सर्व वारकरी श्री विठ्ठलाचे ओढीने पंढरपूरला दरवर्षी आषाढी एकादशीला जात असतात. या दिंडीतून वृक्षारोपण, रक्तदान, स्त्री शिक्षण असे सामाजिक संदेश देत असतात. विद्यार्थ्यांनी या दिंडीत सहभागी होऊन महाराष्ट्राच्या परंपराचे पाईप व्हावे, असे प्रतिपादन दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन आनंद देसाई यांनी केली आहे.

हिंद सेवा मंडळाच्या दादा चौधरी विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त शहरातून दिंडीची मिरवणूक काढण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी व सेनापती दादा चौधरी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यानंतर हिंद सेवा मंडळाचे माजी कार्याध्यक्ष अजित बोरा यांच्या हस्ते श्री विठ्ठलाची आरती करण्यात आली.

याप्रसंगी दादा चौधरी विद्यालयाचे चेअरमन अनंत देसाई, मुख्याध्यापिका कु. जामगावकर, मेहेर इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या प्रा.अनुरीता झगडे, सौ.नंदा कानिटकर, वर्षा गुंडू, जयसुधा ताटी, श्रीमती घोडेकर, गोविंद धर्माधिकारी, नंदे सर, दीपक शिंदे, भोसले सर, प्रसाद सामलेटी, मनोज हिरणवाळे, सुजय रामदासी आदी उपस्थित होते.

शाळेतील विद्यार्थ्यांनी ज्ञानोबा, माऊली, तुकाराम, जय हरी विठ्ठल, श्री विठ्ठलाच्या नामाचा जय जयकार केला. दिंडीची मिरवणूक दादा चौधरी विद्यालय, पटवर्धन चौक, लक्ष्मी कारंजा, नवी पेठ, कापड बाजार, नेता सुभाष चौक, चितळे रोड येथून दादा चौधरी विद्यालयात समारोप करण्यात आला.



दादा चौधरी विद्यालयात आषाढी एकादशीनिमित्त काढण्यात आलेल्या दिंडीत सहभागी झालेले विद्यार्थी. समवेत चेअरमन अनंत देसाई, अजित बोरा, मुख्याध्यापिका कु. जामगावकर आदी.

## दादा चौधरी विद्यालयात आषाढी एकादशी निमित्त दिंडीची मिरवणूक

# १९ जुलै रोजी मोफत डोळे तपासणी, मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन

नगर – जामखेड येथे स्व. सुंदरबाई कन्हैय्यालाल शिंगवी सेवाभावी प्रतिष्ठान आदर्शऋषीजी महाराजसाब यांच्या आशिर्वादाने व आनंदऋषीजी नेत्रालय व शिंगवी चष्माघर यांच्या संयुक्त विद्यमाने १९ जुलै रोजी सकाळी १० ते दुपारी २ वाजेपर्यंत शिबीराचे अत्यंत अल्प दरात लेन्स टाकून शस्त्रक्रिया शिबीराचे आयोजन करण्यात आले आहे.

मोतीबिंदू शस्त्रक्रियासह, कॉर्निया, टेरिझन, रेटिना व नेत्ररोग या सर्व तपासण्या व शस्त्रक्रिया तसेच लहान मुलांचे मोतीबिंदू, तिरळेपणा, पापणी लवणे या देखील शस्त्रक्रिया महात्मा जन आरोग्ययोजनाद्वारे मोफत केले जातील. मधुमेह रूग्णांसाठी मागील पडदा (रेटिना) याचीही शस्त्रक्रिया केली जाईल.

शिबीरातील उपलब्ध सुविधा मोफत ऑपरेशन करून अल्प दरात लेन्स बसविण्यात येतील. मोफत औषधोपचार, काळा चष्मा, जामखेड ते अहमदनगर येण्या–जाण्याची मोफत सोय, राहण्याची व जेवणाची सोय, आधारकार्ड किंवा रेशनकार्ड यापैकी एकाची झेरॉक्स, चालु औषधे व गोळ्या बरोबर आणाव्यात असे ट्रस्टचे सचिव अभय शिंगवी यांनी सांगितले.

ऑपरेशन झाल्यानंतर सव्वा महिना पर्यंत मोफत जामखेड येथे तपासणी केली जाईल.

गरजूंनी याचा लाभ घ्यावा. नाव नोंदणी आवश्यक आहे. नाव नोंदणी शिंगवी चष्माघर, जुना कापड बाजार, हॉटेल देवेंद्र बिल्डींग, अहमदनगर मो.नं.९२८४०५८८५९ व शिंगवी चष्माघर, मेनरोड, जामखेड फो नं. ९२२६१२२०६१ येथे करावी, असे शिंगवी चष्माघरचे संचालक अजित शिंगवी यांनी सांगितले.



आषाढी एकादशीनिमित्त हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक विभागातर्फे भक्तीमार्ग व समतेची शिकवण देणाऱ्या संतपरंपरेचा विद्यार्थ्यांनी सादर केलेला देखावा.

# भक्तिमार्ग आणि समतेची शिकवण देणाऱ्या संत परंपरेचा विद्यार्थ्यांनी साकारला देखावा

### हिंद सेवाच्या प्राथमिक विभागाचा आगळावेगळा उपक्रम

नगर – बागडपट्टी येथील हिंद सेवा मंडळाच्या प्राथमिक विभागातील विद्यार्थ्यांनी आकर्षक अशी वेशभूषा करून ज्ञानेश्वरीचे लेखन करणारे संत ज्ञानेश्वर महाराज, जगद्गुरु संत तुकाराम महाराज यांचा आशीर्वाद घेताना छत्रपती शिवाजी महाराज, संत एकनाथ महाराज, संत नामदेव महाराज, संत महमंद महाराज शेख, संत जनाबाई, विठ्ठल, रुक्मिणी तसेच वारकरी यांची सुंदर वेशभूषा विद्यार्थ्यांनी साकारली होती. शाळेचे चेअरमन मधुसूदन सारडा यांच्या हस्ते पांडुरंगाची व संतांची पूजा करण्यात आली. याप्रसंगी मुख्याध्यापक विठ्ठल उरमुडे व शिक्षक उपस्थित होते.

संतांनी दिलेल्या समतेची व ममतेची शिकवण्याची स्वतंत्र आकर्षक कमान देण्यात आली होती. या सुंदर संत परंपरेच्या देखाव्या जवळच संतांची माहिती असणारे फलक लावण्यात आले होते. मुलांनी दिवसभर फलकाचे वाचन करून ज्ञान आत्मसात केले. संतांच्या जीवनावर आधारित प्रश्नमंजुषेचा चालता बोलता हा कार्यक्रम घेण्यात आला. मुलांनी समर्पकपणे उत्तरे देत बक्षिसे जिंकली.

कार्यक्रमात सौ. वैजयंती तुंगार व त्यांच्या सहकाऱ्यांनी भजनी मंडळी ग्रुप ने संताचे अभंग व श्री विठ्ठल भजन व भारुड या कार्यक्रमाने विद्यार्थी व पालक मंत्रमुग्ध झाले. सुंदर ते ध्यान उभे विटेवरी, पंढरीचा राजा माझा विठ्ठल, पाऊले चालती पंढरीचे वाट, या शेजारणीने बरं नाही केलं बया मला पंढरीला नेला ग बया, रुप पाहता लोचणी अशी भक्तीमय मधुर गीते गायिली. पंढरीचा राजा पांडुरंगाचे अलंकार, वस्त्रे तसेच वारकरी संप्रदायातील वाद्ये मृदुंग, टाळ, वीणा, चिपळ्या, हार्मोनियम, तबला हे वारकरी संप्रदायाचे साहित्य आकर्षक मांडणी करून टेबलावर विद्यार्थ्यांच्या माहितीसाठी ठेवण्यात आले होते.

या कार्यक्रमासाठी शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी विद्यार्थी व पालक उपस्थित होते.

# शत्रुकडून 'सुलताना' लकब मिळविणारी 'चांदबिबी' हे जगातील एकमेव उदाहरण

### इंजिनियर अभिजीत वाघ

नगर – १३ जुलै सुलताना चांदबीबीचा ४२४ वा शहीद दिवस. मुर्तजा निजाम यांच्यानंतर अहमदनगर निजामशाहीवर मोगल दक्षिणेतून हल्ले होऊ लागले. तेव्हा अहमदनगर वाचविण्यासाठी चांदबिबी हीने अहमदनगर येथे परतण्याचा निर्णय घेतला. अकबर पुत्र मुराद यानी अहमदनगर किल्ल्यावर हल्ला केला. पण अनेक दिवस लढवून किल्ला ताब्यात येत नव्हता. शेवटी किल्ल्याची एक भिंत दारू गोळ्याने उडवली, परंतु सकाळी उठून पाहतो चांद बीबी व तिच्या सैन्याने ती रात्रीतून पुन्हा उभी केली. तिचे शौर्य पाहून राजपुत्र मुराद यानी तिला सुलताना ही लकब दिली. व ते करून तो वरहाड प्रांताकडे निघून गेला.नंतर त्याचा भाऊ राजपुत्र दानीयाल याने किल्ल्याला वेढा दिला. अनेक महिने तो वेढा चालू होता. शेवटी त्याने एका सरदारला फितूर केले. त्यांनी दगाबाजीने सुलताना चांदबिबीवर तिच्या महालात हल्ला केला. त्यात ती व तिच्या सत्तर अंगरक्षक मैत्रिणी या शहीद झाल्या. त्यांचे प्रेत ही त्या राहत असलेल्या महाला जवळील मछली बावडी येथे सापडले. त्यात एका रत्नजडित सँडल वरून सुलताना चांदबीबी यांचे प्रेत ओळखले गेले. त्या सँडलची रत्नांची किंमत त्याकाळी तीन लक्ष होती. असे समकालीन इतिहासकारांनी नोंद केली. ते सँडल राजपुत्र दानियाल याने पुढे आग्रा येथे पाठवले असे अभिवादन करताना मराठा सेवा संघाचे महानगर अध्यक्ष इंजि. अभिजीत वाघ यांनी सांगितले.



चांदबीबी यांच्या ४२४ व्या शहीद दिनानिमित्त मखदुम एज्युकेशन ॲण्ड वेल्फेअर सोसायटी व इतिहासप्रेमी मंडळातर्फे त्यांच्या कबरीवर फुले वाहून त्यांना अभिवादन करण्यात आले.

अहमदनगर निजामशाहीची राणी सुलताना चांदबीबी यांच्या ४२४ व्या शहीद दिनानिमित्त मख़दुम एज्युकेशन अँड वेल्फेअर सोसायटी व इतिहास प्रेमी मंडळाच्या वतीने त्यांच्या कबरीवर फुलं अर्पण करून त्यांना अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी अभिजीत वाघ, इतिहास प्रेमी मंडळाचे अध्यक्ष आसिफ दुलेखान, जीवन फाउंडेशनचे अध्यक्ष आरिफ सय्यद,उर्जिता फाउंडेशनच्या संध्या मेढे, मुस्कान असोसिएशनचे अध्यक्ष शफकत सय्यद, आर्कि. फिरोज शेख, तंन्जिमे उर्दु अदबचे अध्यक्ष सय्यद खलील, आयबी शहा, ईस्माईल शेख, फिरोज शेख आदी उपस्थित होते. उपस्थितांनी चांदबीबीच्या कबरीचा शोध लावून प्रथमच त्यांना अभिवादन केल्याबद्दल आयोजकांचे कौतुक केले, व असाच अहमदनगरचा इतिहास शोधून ते समाजापुढे आणण्याचे त्यांना आवाहन केले.

पुढे बोलताना अभिजीत वाघ म्हणाले की, युद्ध संपले की शत्रुत्व संपते. राजपुत्र दानियाल यांनी सुलताना चांदबीबी हीची कबर शाही कब्रस्तान बागरोजा येथे बांधण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे अहमद निजामशहा यांच्या कबरीच्या उत्तर पूर्व कोपऱ्यात जी कबर आहे ती सुलताना चांद बीबी हिची आहे. अनेक वर्ष इतिहासप्रेमी मंडळ यांनी त्यावर संशोधन केले आहे. तसेच तिच्या अंगरक्षक सहेली यांचे पण कबरी बागरोजेच्या पश्चिम दरवाजा समोरील जागेत जो गंजे शहीदा आहे तिथे आहे.

पुढे काही वर्षानंतर मीर अबु तुराब मशदी याने चांदबिबीच्या अस्थी इराण येथे नेल्या व तेथे चांदबीबीची कबर मशद इमाम रजा यांच्या दर्गा परिसरात आहे यासंबंधीचे शोध चांदबीबीच्या कबरीचा हे पुस्तक लवकरच इतिहास प्रेमी मंडळ प्रसिद्ध करणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मखदूम सोसायटी व इतिहासप्रेमी मंडळाच्या सर्व सदस्यांनी भरपूर प्रयत्न केले.

# कॅलिडोस्कोप



मोले रोबोटिक्सने रोबोटिक किचन तयार केलं आहे. या स्वयंपाकघरात किराणा माल भरण्यापासून जेवण वाढण्यापर्यंतची कामं करण्याची जबाबदारी रोबोच्या खांद्यांवर असेल. मग काय मंडळी, भविष्यात रोबोच्या हातचं खावं लागलं तर आश्चर्य वाटायला नको.

## खड्ड्यातून निघतात ज्वाळा

जगातल्या बऱ्याच ठिकाणांमध्ये अनेक रहस्यं दडली आहेत. ती अजूनही उघड झालेली नाहीत. असंच एक ठिकाण म्हणजे तुर्कमेनिस्तानचं काराकुम वाळवंट. ४७ वर्षांपूर्वी इथले घडलेल्या घटनेमागचं गुपित अजूनही उलगडलेलं नाही. इथे पडलेल्या एका खड्ड्यातून गेल्या ४७ वर्षांपासून आगीच्या ज्वाळा बाहेर पडत आहेत. म्हणूनच इथले लोक या खड्ड्याला नरकाचं द्वारं म्हणतात. तर या वाळवंटात असा खड्डा का पडला? यामागचं नेमकं कारण काय? जाणून घेऊ या.

१९७१ च्या दशकात त्या वेळच्या सोव्हिएत युनियन म्हणजे रशियाचे काही शास्त्रज्ञ नैसर्गिक वायूच्या शोधासाठी या वाळवंटात आले. इथे त्यांनी एक खड्डा खोदला. खड्ड्याच्या आसपास मोठाल्या मशीन्सनी खोदकाम सुरू केलं. पण अचानक एके दिवशी जमिनीचा मोठा भाग खचला आणि भला मोठा खड्डा पडला. हा खड्डा ६० फूट खोल आणि १३० फूट रूंद होता. यातून सातत्याने मिथेन वायू बाहेर पडत होता. हा वायू जाळून टाकला तर काही दिवसांनी आपोआप नष्ट होईल, असा विचार करून शास्त्रज्ञांनी आग लावली. पण मिथेन वायू काही नष्ट झाला नाही. गेल्या ४७ वर्षांपासून या खड्ड्यातून आग धुमसत आहे. यातून निघणाऱ्या आगीच्या ज्वाळा पाहून कोणाचाही थरकाप उडेल. नरकातही अशाच प्रकारच्या आगीच्या ज्वाळा असल्याने इथल्या लोकांना हे स्थान म्हणजे नरकाचं द्वारच वाटतं. तुर्कमेनिस्तान सरकारने हा खड्डा भरण्याचा बराच प्रयत्न केला. पण यात त्यांना यश आलं नाही. आता हे स्थान पर्यटन स्थळ बनून गेलं आहे. हा चमत्कार पाहण्यासाठी लोक लांबून इथे येतात.



## ...अंतराळात रॉंग नंबर!



अमेरिकेतली अंतराळ संशोधन संस्था नासाच्या ह्युस्टन तळावर अचानक गोंधळ उडाला. अंतराळातून आलेल्या एका फोनमुळे इथला अलार्म वाजू लागला. यामुळे अंतराळयानातले अडथळे दुरूस्त करण्यासाठी शास्त्रज्ञांची धावपळ सुरू झाली. नेमकं काय झालं आहे याचा थांग कोणालाही लागत नव्हता. पण आपत्कालीन अलार्म वाजल्यामुळे सगळेजण सावध झाले. अर्थात हे सर्व एका चुकीमुळे झालं होतं. अंतराळवीराने चुकीचा नंबर डायल केल्यामुळे सर्व गोंधळ उडला. नासाच्या जॉन्सन अंतराळतळावर वाजलेल्या या अलार्ममुळे इंटरनॅशनल स्पेस स्टेशनवरची संपूर्ण टीम कामाला लागली. अर्थात हे सगळं घडलं होतं अंतराळवीराच्या छोट्याशा चुकीमुळे. त्याने आपत्कालीन क्रमांक फिरवला. नेदरलँडचा अंतराळवीर आंद्रे कुईपरनेच आपल्यासोबत घडलेल्या या घटनेचा खुलासा केला. अंतराळातून उपग्रहाच्या माध्यमातून फोन करण्यासाठी काही विशेष कोड लावणं गरजेचं होतं. फोन करताना सुरूवातीला ९ आणि नंतर ०११ क्रमांक डायल करावा लागतो. पण गुरूत्त्वाकर्षणाच्या अभावी आंद्रेकडून शून्य दाबलंच गेलं नाही. त्यामुळे ९०११ ऐवजी ९११ क्रमांक दाबला गेला. ९११ हा अमेरिकेतला आपत्कालीन क्रमांक आहे. यामुळे अंतराळयानात काही तरी बिघाड झाल्याचं वाटून इथले शास्त्रज्ञ लगबगीने कामाला लागले. याआधी २०१५ मध्ये ब्रिटनच्या एका अंतराळवीरानेही चुकीचा नंबर फिरवला होता. एका महिलेला फोन लागल्याने त्याने माफी मागून प्रकरण मिटवलं.

## हेअरस्टाईलमुळे वेटर श्रीमंत!



एखाद्या चांगल्या आणि मोठ्या रेस्टॉरंटमध्ये किंवा हॉटेलमध्ये जेवायला गेलो, तर तिथे टीप द्यावी लागते. असे अनेक लोक आहेत, जे वेटर्सना हजारो-लाखो रुपये टीप देतात. सध्या अशीच एक महिला वेटर चर्चेमध्ये आहे. टिप मिळवण्यासाठी तिने अशी पद्धत अवलंबली, की अवघ्या काही दिवसांमध्येच ग्राहकांकडून तिला लाखो रुपयांच्या टिप्स मिळाल्या.

वेटर्सची चांगली सेवा आणि ग्राहकांप्रती विनम्र वृत्ती यामुळे अधिक टिप्स मिळण्यास मदत होते, असे अनेकदा दिसून येते. याशिवाय वेटर्सचा आकर्षक लूकही अनेकदा ग्राहकांना खूश करण्यात मदत करतो; पण या महिलेला केवळ तिची हेअरस्टाईल बदलून इतकी टीप मिळाली, की कल्पनाही करू शकत नाही. या महिलेने तिच्या शिफ्ट दरम्यान अनेक वेगवेगळ्या केशरचना केल्या आणि टिप म्हणून सुमारे १.३ लाख रुपये मिळाले. सॅम मॅकॉल नावाच्या या महिलेने तिच्या टिकटॉक हँडलवर एक व्हिडिओ शेअर केला. त्यात 'माझ्याकडून अधिक टिप्स कोणाला मिळतात, हे पाहण्यासाठी मी सर्व्हर हेअर थिअरी ट्राय करत आहे' असे लिहिले होते. तिने तिचे केस रंगीबेरंगी हेडस्कार्फने स्टाईल केले आणि तिला टीप म्हणून ३१० डॉलर मिळाले, तर दुसऱ्या दिवशी तिने कपाळावर बँड लावून डच वेण्या घातल्या. त्यानंतर तिला ४२८ डॉलर म्हणजे अंदाजे ३६ हजार रुपयांची टीप मिळाली.

यानंतर एके दिवशी तिने तिच्या हेअरस्टाइलचा आणखी एक प्रयोग केला आणि या वेळी तिला ४६५ डॉलर्स म्हणजेच जवळपास ३९ हजार रुपये टिप मिळाले. सॅमचा हा व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होताच लोकांनी वेगवेगळ्या प्रतिक्रिया देण्यास सुरुवात केली. काही वापरकर्त्यांनी सांगितले, की त्यांना नीटनेटके हेअरस्टाइल असलेले सर्व्हर आवडतात, तर एका वापरकर्त्याने लिहिले, की मीदेखील अशाच प्रकारच्या हेअरस्टाइलचा प्रयोग केला होता आणि ते काम करत होते; परंतु मला पुरुषांचे डोळे आवडले नाहीत.

## राजस्थानात आढळला उडणारा साप!



पावसाचे आगमन झाले आहे. या ऋतूमध्ये अनेक कीटक बाहेर दिसतात. पण राजस्थानमध्ये एक आगळीवेगळी घटना समोर आली. ही घटना पाहिल्यानंतर नागरिकांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले. राजस्थानमध्ये एका छतावर साप आढळला. साधारणपणे या ऋतूत साप आणि असे इतर प्राणी खूप दिसतात; पण हा साप काही सामान्य साप नव्हता.

राजस्थानच्या प्रतापगड जिल्ह्यात नुकताच एक उडणारा साप दिसला. हा प्रकार पाहिल्यानंतर नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. राजस्थानच्या प्रतापगडमधील लोकांनी घराच्या छतावर 'ब्रांच बँक ट्री स्नेक' प्रजातीचा उडणारा साप पाहिला. यानंतर लोकांनी सर्पमित्रांशी संपर्क साधला. यानंतर त्यांनी या सापाची सुटका केली. त्याला जंगलात सोडले. बिहार आणि उत्तराखंडमध्येही असे उडणारे साप दिसल्याचा दावा केला जात आहे. हा साप प्रत्यक्षात उडत नाही. उलट उडी मारतो, म्हणूनच लोक त्याला उडणारा साप म्हणतात.

हा साप विषारी नाही. त्याचे इंग्रजी नाव Bronze Back Tree Snack असे आहे. साधारणपणे हा साप जंगलात आढळतो. हवेत सुमारे ४-५ मीटर लांब उडी घेऊन तो एका झाडावरून दुसऱ्या झाडावर उडी मारत तो तिथे पोहोचतो; मात्र त्याची उडी इतकी लांब आहे, की पाहणाऱ्यांना तो प्रत्यक्षात उडणारा साप वाटतो. प्रतापगडमध्ये हा साप पाहून परिसरातील नागरिकांमध्ये

## दोस्ती संकटकाळातली!

सर्वसाधारणपणे अजगर किंवा साप बेडकाला खातात. पण संकटकाळी प्राणीच एकमेकांची मदत करतात. इतर प्राण्यांना वाचवतात. अगदी आपला शत्रू किंवा खाद्य असलं तरी दुजाभाव करत नाहीत. असंच काहीसं ऑस्ट्रेलियामध्ये पहायला मिळालं. इथे वादळाने धुमाकूळ घातल्यानंतर माणसंच काय, तर पशूपक्षीही सुरक्षित स्थळी जाण्याची धडपड करत होते. वादळी वारे आणि पाऊस यापासून बचाव करण्यासाठी त्यांचे प्रयत्न सुरू होते. म्हणूनच एका अजगराच्या पाठीवर बसून जाणारे बारा बेडूक चर्चेचा विषय ठरले. स्थानिक नागरिक अँड्रू मॉक यांनी या वरातीचा फोटो ट्विटरवर शेअर केला आणि तो सगळीकडे व्हायरल झाला. संकटकाळी एकमेकांचे कट्टर शत्रूही कसे जवळ येतात हेच यातून पहायला मिळालं. ११ फूट लांब अजगराच्या पाठीवरून हे बेडूक शेताच्या पलीकडे जायला निघाले होते. मॉक यांच्याच शेतातही ही घटना आहे. रात्री दीडच्या सुमारास जोरदार वादळ आणि पावसामुळे मॉक झोपेतून जागे झाले. त्यावेळी बाहेर पुरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती. शेताची अवस्था पाहण्यासाठी बाहेर आलेल्या मॉकना बेडूक आणि अजगराचं दृष्य दिसलं आणि त्यांनी हा नजारा कॅमेऱ्यात बंदिस्त केला.



## आरोग्यविषयक नोंदींसाठी...

सध्याच्या वाढत्या आरोग्यविषयक तक्रारी पाहता ॲपल कंपनीने आरोग्याशी संबंधित उपकरणं तयार करण्यावर भर दिला आहे. ॲपलने विशिष्ट फॅब्रिकपासून बनवलेल्या हातमोज्यांचं पेटंट घेतलं असून ते रक्तदाब, श्वासाची गती तसंच हृदयाच्या ठोक्यांकडे लक्ष ठेवतील, अशा पध्दतीने तयार केले आहेत. या हातमोज्यांमध्ये विशिष्ट प्रकारचे सर्किट फॅब्रिकला जोडण्यात आले आहेत. यामुळे ते शरीरातल्या प्रत्येक बदलाकडे बारीक लक्ष ठेवतील. या हातमोज्यांचं आपल्या प्रत्येक हालचालीकडे बारीक लक्ष असेल. ते स्मार्टफोन किंवा लॅपटॉपला जोडता येत असल्याने आरोग्यविषयक माहिती वापरकर्त्यांपर्यंत पोहचू शकेल. कंपनीने काही वेअरेबल डिव्हाईसही सादर केली. आता हे इलेक्ट्रॉनिक हातमोजे याच प्रकल्पांचा भाग आहेत. कोरियन ॲडव्हान्स इन्स्टीट्यूट ऑफ सायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि कोलोन ग्लोटेकने ओएलईडी स्क्रीन तयार केला आहे. हा स्क्रीन कपड्यांमध्ये बसवता येतो. तो मोबाईलप्रमाणे वापरता येतो. हा स्क्रीन दुमडता येतो. रात्री स्क्रीन जास्त चमकतो आणि डिस्प्ले अधिक चांगल्या प्रकारे काम करतो. यामुळे येत्या काळात आरोग्याशी संबंधित विविध उपकरणं बाजारात येण्यासाठी सज्ज झाली आहेत.



## भरणा स्लीपवर लिहिली रास!




एक महिला बँकेत दोन हजार रुपये भरण्यासाठी आली. त्यासाठी तिने डिपॉझिट स्लीप घेतली आणि त्यात माहिती भरण्यास सुरुवात केली. स्वतःचे नाव, अकाऊंट नंबर इत्यादी माहिती तिने अचूकरित्या त्या स्लीपवर भरली; पण रकमेच्या कॉलममध्ये हिंदीत 'राशी' असा उल्लेख होता. तिथेच ती महिला गोंधळली आणि तिने तो कॉलम भरताना चूक केली. तिने लिहिलेला मजकूर पाहून त्या बँकेचे कर्मचारी क्षणभरासाठी हबकले आणि नंतर तिथे हास्याचा धबधबा फुटला.

संगीता नावाच्या महिलेने स्टेट बँकेची डिपॉझिट स्लिप भरली. तिने तिचा अकाऊंट नंबरही लिहिला; पण त्याच डिपॉझिट स्लिपमध्ये रकमेच्या कॉलममध्ये हिंदीमध्ये 'राशी' (रक्कम) असे लिहिले होते. त्या शब्दामुळे गोंधळलेल्या महिलेने तिथे पैशांच्या रकमेऐवजी स्वतःची राशी 'तुला' असे लिहिले. ही स्लीप तेथील बँक कर्मचाऱ्यानी पाहिल्यावर त्यांनाही हसू फुटले. याबाबतचा व्हिडिओ व्हायरल झाला असून तो पाहून अनेकांना हसू फुटले. काहींनी संमिश्र कमेंट्स केल्या. त्या वाचून तर अजूनच हसायला येईल. तिची रास तूळ नाही शनी आहे, अशी मजेशीर कमेंट एकाने केली. दुसऱ्या व्यक्तीने तिची बाजू सावरून घेतली. चूक त्या महिलेची नाही, बँकेची आहे. धन राशी लिहायला हवे होते, असे त्याने म्हटले.

## असा हा मानवी मेंदू

माणसाच्या सर्व हालचाली नियंत्रित करणारा अवयव म्हणजे मेंदू. सर्वशक्तीमान अशा मेंदूमुळेच माणूस इतर सजिवांपेक्षा उजवा ठरतो. अशा या मेंदूची रचना कशी आहे? त्याचं महत्त्व काय? मानवी मेंदूचं वजन सर्वसाधारणपणे तीन पाउंड असतं. ६० टक्के भाग चरबीने भरला असल्याने मेंदू हा मानवी शरीरातला सर्वाधिक चरबीयुक्त अवयव आहे. या मेंदूत जागृतावस्थेत जवळपास २३ वॅट ऊर्जा निर्माण करण्याची क्षमता असते. आपल्या शरीरात निर्माण होणारं रक्त तसंच ऑक्सिजनचा २० टक्के भाग मेंदूला मिळतो. मेंदूचा रक्तपुरवठा थांबल्यानंतर साधारण ८ ते १० सेकंदांनी माणसाची शुद्ध हरपते. ऑक्सिजनअभावी ५ ते ६ मिनिटांमध्ये मेंदू मृतवत होतो. मेंदूमध्ये असलेल्या रक्वाहिन्यांची लांबी जवळपास एक लाख मैल इतकी आहे. मेंदूत १०० अब्ज न्यूरॉन्स असतात. वयापरत्वे आपली स्मरणशक्ती क्षीण होत जाते. अमेरिकेतल्या शास्त्रज्ञांच्या मते मेंदू जुन्या आठवणी किंवा काढून टाकू शकत नसल्याने त्याला नव्या आठवणी साठवता येत नाहीत. म्हणून माणूसाला विस्मरण होतं. माणसाच्या शरीरातलं २५ टक्के कोलेस्टेरॉल मेंदूमध्ये असतं. पुरेशा कोलेस्टेरॉलअभावी मेंदूतल्या पेशी मृतवत होतात. पुरूषांच्या मेंदूचा आकार महिलांपेक्षा दहा टक्क्यांनी मोठा असतो.



प्रसिद्ध शास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईनच्या मेंदूचं वजन सरासरीपेक्षा दहा टक्के कमी म्हणजे २.७१ पाउंड होतं. पण त्याच्या मेंदूतल्या न्यूरॉन्सची घनता सरासरीपेक्षा बरीच जास्त होती.

## आरोग्याची हेळसांड नको!

सर्वसामान्य वाटणारा आजार कधी रौद्र रुप धारण करेल सांगता येत नाही. साध्या सर्दी खोकल्याचं रूपांतरही गंभीर आजारात होऊ शकतं. त्यामुळे आपण आरोग्याची हेळसांड करू नये. ब्रिटनमधल्या हॅम्पशायरच्या विंचेस्टर नावाच्या शहरात राहणाऱ्या ॲलेक्स लेविसला साधा सर्दी-खोकला झाला. काही काळानंतर त्याला ताप यायला लागला. साधा सर्दी खोकला वाटून त्यानेही याची फारशी दखल घेतली नाही. पण काही काळानंतर त्याची तब्बेत बिघडली. त्वचाही काळी पडू लागली. या आजारामुळे लेविसचे तीन अवयव निकामी झाले. त्याचे हे अवयव काढून टाकण्यात आले. इतकंच नाही, तर त्याच्या तोंडाचा बराचसा भागही निकामी झाला. सर्दी-खोकल्यानंतर लेविसच्या मूत्रातूनही रक्त पडू लागलं. लेविस वाचू शकणार नाही, असं डॉक्टराचं म्हणणं होतं. तो वाचला. पण त्याचं आयुष्य मृत्यूपेक्षाही भयानक झालं. अशा जगण्यापेक्षा मृत्यू परवडला असेच उद्गार कोणाच्याही तोंडून बाहेर पडतील. रुग्णालयात दाखल करेपर्यंत लेविस कोमामध्ये गेला होता. त्याला ग्रुप ए स्टेपटोकस नामक रक्तविकार झाल्याचं निदान करण्यात आलं. लेविसच्या विकाराने खूप कमी वेळात रौद्ररुप धारण केलं. त्याच्या शरीरात मांस खाणाऱ्या बॅक्टेरियांचा संसर्ग झाला होता. ताप आल्यानंतर लेविसव्या शरीरात भयंकर मांसभक्षी जंतू विकसित होऊ लागले. यामुळे त्याचे दोन्ही पाय आणि डावा हात कापावा लागला. त्याचा चेहराही विद्रूप झाला. ब्रिटनमध्ये हा विकार दुर्मीळ मानला जातो. ३३ हजार लोकांपैकी एकाला हा विकार जडण्याची शक्यता असते. त्यामुळे छोट्याशा सर्दी-खोकल्याकडेही दुर्लक्ष करू नये.



# नगर लोकसभा मतदार संघातील 'त्या' ४० मतदान केंद्रांवरील ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची पडताळणी करण्याचे आदेश



नगर - नगर लोकसभा निवडणुकीत पराभूत झालेले महायुतीचे उमेदवार डॉ.सुजय विखे पाटील यांची मागणी अखेर मान्य करण्यात आली आहे. सुजय विखे पाटील यांनी केलेल्या मागणीनुसार ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची पडताळणी होणार आहे. आक्षेप घेतलेल्या मतदान केंद्रावर मशीनची मेमरी रिकामी करून पुन्हा मतदान प्रक्रिया म्हणजेच मॉकपोल राबवली जाणार आहे. याबाबतचे आदेश केंद्रीय निवडणूक आयोगाने दिले आहेत.

डॉ. सुजय विखे पाटील यांनी ४ जूनला मतमोजणी पार

### डॉ. सुजय विखे यांची मागणी केंद्रीय निवडणूक आयोगाने केली मान्य

पडल्यानंतर १० जून रोजी मतदारसंघातील ४० मतदान केंद्रावरील ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची पडताळणी करण्यासाठी जिल्हा निवडणूक विभागाकडे अर्ज केला होता. केंद्रीय निवडणूक आयोगाने आता जिल्हा निवडणूक विभागाला मॉकपोल करण्याच्या सूचना दिल्या आहेत. त्यामुळे आता या मतदान केंद्रावर ईव्हीएम आणि व्हीव्हीपॅट मशीनची पडताळणी केली जाणार आहे.

अहमदनगर दक्षिण लोकसभा मतदारसंघात पुन्हा एकदा मतदान यंत्राची तपासणी करून मतमोजणी होणार आहे. ज्या ४० मतदान केंद्रावर सुजय विखे पाटील यांनी आक्षेप घेतला आहे. त्या ठिकाणी व्हीव्हीपॅटची मोजणी होणार आहे. ही मोजणी आणि पडताळणी कशा पद्धतीने होणार आहे हे जाणून घेण्यासाठी सर्वजण उत्सुक आहेत.

### अशी केली जाणार मतदान यंत्राची पडताळणी

सुरुवातीला ईव्हीएम बनवलेल्या कंपनीचे अधिकारी मशीनची तांत्रिक तपासणी करतील. यानंतर आक्षेप घेतलेल्या ४० यंत्राची मेमरी रिकामी केली जाईल. यानंतर शेजारीच तयार केलेल्या मतमोजणी कक्षात पेपर स्लीप (व्हीव्हीपॅट) आणि ईव्हीएम मशीनवरील मतांची पडताळणी केली जाणार आहे. एका मशीनमध्ये प्रत्येकी १ ते १४०० मते टाकता येणार आहेत. किती मते करायचे हे ठरवण्याचे अधिकार उमेदवारांना आहेत. ही सर्व प्रक्रिया सीसीटीव्हीच्या निगरानीत पार पडणार आहे.

# राज्य कबड्डी संघटनेच्या मतदार यादीतील अवैध अर्जाच्या निर्णयाविरोधात खा. निलेश लंकेंची उच्च न्यायालयात धाव

### मुंबई उच्च न्यायालयात गुरूवारी होणार सुनावणी

नगर - राज्य कबड्डी संघटनेच्या निवडणूकीसाठी अंतिम यादीतील बदल अहवाल वेळेत न दिल्याचे कारण देत मतदानासाठी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी अवैध ठरविल्याच्या निर्णयाविरोधात खा. निलेश लंके व सच्चिदानंद भोसले यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली असून लंके व भोसले यांच्या याचिकेवर गुरूवारी (दि.१८) सुनावणी होणार आहे. दरम्यान, येत्या २१ जुलै रोजी ही निवडणूक प्रक्रिया पार पडणार आहे.

राज्य कबड्डी संघटनेच्या निवडणूकीसाठी अहमदनगर जिल्हा संघटनेने मतदार म्हणून पाठविलेली खा. निलेश लंके व सच्चिदानंद भोसले यांची नावे निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी पहिल्या यादीत अवैध ठरविली. या निर्णयाविरोधात म्हणणे मांडण्यासाठी ३ जुलै पर्यंत मुदत देण्यात आली होती. संघटनेच्या वतीने देण्यात आलेल्या मुदतीत सर्व अटींची पुर्तता करण्यात आली होती. त्यानंतरही खा. लंके, भोसले यांच्यासह इतर जिल्ह्यातील काही नावे अवैध ठरविण्यात आली आहे.

अवैध ठरविण्यात आलेल्यांमध्ये अरविंद सावंत (रत्नागिरी), समीर थोरात (सातारा), मनोज ठाकूर, वक्रेश राउत व माणिक वोतोंडे (पालघर) यांचाही समावेश आहे.



खा. निलेश लंके यांनी सांगितले की, नगर जिल्ह्यातून आपला व सच्छिदानंद भोसले यांचा दाखल करण्यात आलेला अर्ज बाद करण्यामागे मोठे षडयंत्र दिसते. स्पोर्टस कोड २०११ आणि दिल्ली उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार नामांकन करताना धर्मदाय आयुक्त यांचे रेकॉर्ड सादर करण्याचे बंधन नाही. स्पोर्टस कोडनुसार अध्यक्ष आणि सचिव यांनी पाठविलेली नावे ग्राहय धरली जातात. जेंव्हा प्रतिनिधी नामांकन करतात कार्यकारणी ठराव महत्वपूर्ण असतो. त्यात बदल अर्ज एक वर्षात कधीही दाखल केला जाऊ शकतो. ही एक औपचारीकता असते, कायदा नाही. कार्यकारणी किंवा सर्वसाधारण सभेचा ठराव महत्वाचा असतो. आमच्या संघटनेची निवडणूक २०२२ मध्ये झाली असताना आम्ही बदल अर्ज कसा केलेला नसेल ? असा सवाल खा. लंके यांनी केला आहे.

### आता न्यायालयच निर्णय घेईल : खा. निलेश लंके

बदल अर्जाचा कांगावा करून आम्ही मोठा गुन्हा केला आहे असे भासविण्यात येत आहे. आम्ही धर्मदाय आयुक्त कार्यालयात सर्व कागदपत्रांची पुतता वेळेत केलेली आहे. निवडणूक अधिकाऱ्याला २ व ३ जुलै रोजी हरकती, तक्रारी अगोदरच पुर्तता केली होती. तरीही ३० जुन रोजी कागदपत्रे सादर केली नाही म्हणून अर्ज बाद ठरविण्यात आले. हा जुलमी अन्याय आहे. यामागे गहन राजकारण असून आता न्यायालय योग्य तो निर्णय घेईल.

# जैन संतांना 'विहार यात्रेत' पोलीस संरक्षण देण्यात यावे

### सुरक्षेच्या बाबतीत आमदार सत्यजित तांबे यांची मागणी मान्य



नगर - जैन समाज हा भारतातील एक अल्पसंख्याक समुदाय असून भारतातील जैन देशाच्या अर्थव्यवस्थेच्या उभारणीत महत्त्वाची भूमिका बजावतात. अल्पसंख्यांक समुदाय या नात्याने मला सभागृहाचे लक्ष भारतीय जैन संत किंवा भिक्षूंच्या रक्षणाच्या अत्यंत महत्त्वाचा आणि गंभीर प्रश्नाकडे वेधायचे आहेत. जैन समाजात त्याग, भक्ती व निस्वार्थ सेवेमुळे जैन संतांना त्यांच्या समाजात सर्वोच्च स्थान आहे. हे संत एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी कोणत्याही मोटर वाहनाचा वापर न करता चालून प्रवास करतात. दुर्दैवाने अशी विहार यात्रा असताना जैन संत सुरक्षित नसल्याचे वेळोवेळी आढळून आले आहे. विहार यात्रा करत असताना जैन संताना अनेक वेळा अपघातांना सामोरे जावे लागले अनेक वेळा भीषण अपघातामुळे संतांचे अपघाती निधन होते. त्यामुळे महाराष्ट्र समाज उभारणीत संतांचा फार मोठा वाटा असतानाही विहार यात्रेत त्यांचे रक्षण ही करू शकत नाही. अशी भावना जैन समाजात वाढीस लागत आहे. त्यामुळे जैन संतांना विहार यात्रेत पोलीस संरक्षण द्यावे अशी मागणी विधान परिषदेमध्ये आ. सत्यजित तांबे यांनी उपस्थित केली असता मागणीला उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व सरकारने तत्काळ मागणी मान्य करून संबंधित विभागाला निर्देश दिले.

पारनेर तालुका जैन महासंघाचे उपाध्यक्ष प्रसाद कर्नावट व जैन समाजाच्या वतीने आमदार सत्यजित तांबे व उपमुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस व सरकारचे जाहीर आभार मानण्यात आले.

# डेंग्यूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी महापालिकेची प्रत्येक रविवारी 'दर आठवडा - एक दिवस - एक तास' मोहिम

नगर - सध्या मॉन्सूनचा कालावधी सुरु झालेला असून पारेषण काळ सुरु असल्याने डासांचा प्रादुर्भाव वाढून हिवताप, डेंग्यु व चिकनगुन्या या किटकजन्य रोगांच्या रुग्ण संख्येत वाढ होण्याची दाट शक्यता आहे. अहमदनगर महानगरपलिकेच्या परिसरात हिवताप, डेंग्यु व चिकनगुन्या या किटकजन्य रोगांच्या साथी उद्‌भवू नयेत याकरिता नागरिकांनी त्यांच्या रहिवासी परिसरात डासोत्पत्ती टाळणे आणि व्यक्तिगत स्वतः काय काळजी घ्यावी याबाबत मनपातर्फे व्यापक जनजागृती अभियान राबविण्यात येत आहे. डासांच्या अंड्यापासून प्रौढ डास बनण्याच्या प्रक्रीयेला ७-१० दिवस लागतात, त्यामुळे हे चक्र तोडण्याकरीता कोरडा दिवस पाळणे आणि आपल्या घराच्या परिसरामध्ये डासोत्पत्ती स्थाने शोधून नष्ट करणे अशी अभियानाची संकल्पना राबवायची आहे. सध्या मनपामार्फत कंटेनर सर्व्हे तपासणी, धुरीकरण, किटकनाशक फवारणीचे काम सुरू आहे.

या व्यापक जनजागृती मोहिमेचा एक भाग म्हणून सुरुवात अहमदनगर महानगरपालिकेचे सर्व विभागप्रमुख आणि सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी करावयाची असुन त्यांनी त्यांच्या स्वतःच्या घराच्या परिसरामध्ये अस्वच्छता व डासोत्पत्ती होणार नाही याकरिता काळजी घेवुन आणि ते इतरांनाही समजावून सांगणे अत्यंत गरजेचे आहे. याकरिता अहमदनगर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शहरवासियांमध्ये डेंग्यू व किटकजन्य आजारांबाबत जनजागृती होण्यासाठी महानगरपालिकेचे सर्व अधिकारी / कर्मचारी हे पुढील चार महिने दर रविवारी खालील सूचनांचा अवलंब करून आपल्या घराच्या परिसरामध्ये डासोत्पत्ती स्थाने नष्ट करण्याकरिता कार्यवाही करावी अशी सुचना आयुक्त यशवंत डांगे यांनी दिल्या.

१. दर रविवारी सकाळी ९ ते १० च्या दरम्यान आपल्या घराच्या आतील व बाहेरील पूर्ण परिसराचे परीक्षण करावे.

२. घरांमध्ये आणि घराच्या आजूबाजूला कंटेनरमध्ये, टायरमध्ये पाणी साचू देऊ नये. साठवलेल्या पाण्याचे भांडे / ड्रम (कंटेनर ) घट्ट झाकणांनी झाकून ठेवावे.

३. पक्ष्यांचे पाणी पिण्याचे टब, भांडी, फुलदाण्या, रेफ्रिजरेटरखालील ट्रे इत्यादी तपासून घ्यावे व रिकामे करावेत.

४. पावसाचे पाणी साठुन डासांची उत्पत्ती होऊ नये म्हणून छतावरचा घनकचरा साफ करावा.

५. कार्यवाही करतानाचे फोटो समाजमाध्यमांवर छायाचित्रे / व्हिडिओ क्लिप्स टाकून या मोहिमेला अधिकाधिक प्रसिद्धी देण्यात यावी.

या सूचनांप्रमाणे शहरामधील सर्व नागरिकांनी दर रविवारी आपण ही मोहीम राबवत डेंग्यू व किटकजन्य आजारांची जनजागृती आणि प्रतिबंधाकरिता करावयाच्या मोहीमेमध्ये सहभाग घ्यावा.

# नगरमध्ये मोहरम निमित्तची कत्तलची रात्र मिरवणूक शांततेत, विसर्जन मिरवणुकीसाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त तैनात



नगरमध्ये बुधवारी दुपारी मोहरम विसर्जन मिरवणुकीस प्रारंभ झाल्यावर सवाऱ्यांच्या दर्शनासाठी झालेली गर्दी. तर दुसऱ्या छायाचित्रात मिरवणुकीसाठी तैनात असलेल्या पोलिस बंदोबस्तासह पोलिस अधीक्षक राकेश ओला. (छाया - बबलू शेख)

नगर - राज्यात प्रसिध्द असलेल्या मोहरम नवमीनिमित्त नगर शहरातून मंगळवारी (दि.१६) रात्री काढण्यात आलेली कत्तलची रात्र मिरवणूक शांततेत पार पडली. या मिरवणुकीदरम्यान जिल्हा पोलिस दलाच्यावतीने कोणताही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी चोख बंदोबस्त ठेवला होता. बुधवारी (दि.१७) दुपारी मोहरमच्या विसर्जन मिरवणुकीला शहरात सुरुवात झाली असून रात्री सावेडी गावात सवारींचे विसर्जन करण्यात येणार आहे. या विसर्जन मिरवणुकीसाठीही पोलिसांनी मोठा बंदोबस्त तैनात केला आहे.

मंगळवारी शहरातील कोठला परिसरात मोहरमनिमित्त सर्वधर्मिय समाज मोठ्या प्रमाणात उपस्थित होता. रात्री १२ वाजता कोठला येथील छोटे बारा इमाम यांची सवारी उठल्यानंतर कत्तलची रात्र मिरवणुकीस प्रारंभ झाला. मंगलगेट हवेली येथून मोठे बारा इमाम यांची सवारी उठली. कत्तलची रात्र मिरवणूक कोठला, राज चेंबर, कोंड्यामामा चौक, दाळमंडई, तेलीखुंट, कापडबाजार, मोची गल्ली, भिंगारवाला चौक, जुन्या कोर्टाजवळून पंचपीर चावडी, बांबू गल्ली, रामचंद्र खुंट, इदगाह मैदान मार्गे कोठला येथे बुधवारी (दि.१७) सकाळी ९ वाजून ५० मिनिटांनी ही सवारी परत आपल्या जागेवर बसवण्यात आली. संपूर्ण मिरवणूक मार्गावर पोलिसांनी बॅरिकेटींग करत चोख बंदोबस्त ठेवला होता.

मोहरम विसर्जन मिरवणुकीला दुपारी बारा वाजता शहरातील कोठला व मंगलगेट हवेली येथून प्रारंभ झाला. या हुसेन, या हुसेन अशा घोषणा.. सरबताचे वाटप आणि सवारी दर्शनासाठी भाविकांची उडालेली झुंबड अशा वातावरणात मिरवणूक मार्गस्थ झाली. ताबूत सवारी सोबत आणि मिरवणूक मार्गावर मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. कोठला येथून छोटे इमाम हुसेन सवारीने विसर्जन मिरवणुकीला प्रारंभ झाला. कोठला परिसरात ही सवारी खेळवण्यात आली. ही मिरवणूक पाहण्यासाठी कोठला परिसरात नागरिकांनी गर्दी केली होती. राज चेंबर पासून कोंड्यामामा चौकात छोटे इमाम व बडे इमाम यांच्या सवाऱ्या एकत्र आल्या. तेथून दाळमंडई, पिंजार गल्ली, पीरशाह खुंट, खिस्त गल्ली, बांबू गल्ली, पंचपीर चावडी, जुनी मनपा इमारत, जुन्या कोर्टाच्या मागील बाजूने चौपाटी कारंजा, दिल्ली गेट, बालिकाश्रम रोड मार्गे सावेडी गाव येथे विसर्जन असा या मिरवणुकीचा मार्ग असून संपूर्ण मिरवणूक मार्गावर पोलिसांनी बॅरिकेटींग करत चोख बंदोबस्त ठेवला आहे.

### मिरवणूक मार्गावर २०० सीसीटीव्ही कॅमेरे

दरम्यान, मिरवणुकीत अनुचित प्रकार घडू नये म्हणून पोलीस अधीक्षक राकेश ओला यांच्या मार्गदर्शनाखाली अप्पर पोलीस अधीक्षक प्रशांत खैरे, शहर विभागाचे पोलीस उपअधीक्षक अमोल भारती यांच्यासह चार पोलीस उपअधीक्षक, १५ पोलीस निरीक्षक, ३६ सहायक पोलीस निरीक्षक व उपनिरीक्षक, ४०३ पोलीस अंमलदार, आरसीबी, एसआरपीएफचे प्रत्येकी एक प्लॅटून असा बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. विसर्जन मिरवणूक संपेपर्यंत हा बंदोबस्त तैनात राहणार आहे. मिरवणूक मार्गावर सुमारे २०० सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आले आहे. ७५ ते ८० ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात आले आहे.

# केडगाव रोडवर वृद्धाला धमकावून सोन्याच्या अंगठ्यांसह रोकड लंपास

नगर - गाडीला कट मारल्याचा कांगावा करत एकाने वृद्ध व्यक्तीला जीवे मारण्याची धमकी देत त्यांच्या हातातील सोन्याच्या २ अंगठ्या, खिशातील रोकड काढून घेत लुटल्याची घटना मंगळवारी (दि.१६) सकाळी १०.३० च्या सुमारास केडगाव बायपास चौकाजवळ घडली.

याबाबत सूर्यभान दौलतराव लामखडे (वय ६२, रा. गांजी भोयरे, ता. पारनेर) यांनी कोतवाली पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी लामखडे हे आणखी एका व्यक्तीसह मोटारसायकलवर नगर पुणे रोडने नगरकडे येत होते. सकाळी १०.३० च्या सुमारास ते केडगाव बायपास चौक ओलांडून केडगावच्या दिशेने येत असताना त्यांच्या पाठीमागून मोटारसायकलवर एक व्यक्ती आला.

त्याने लामखडे यांना मोटारसायकल रस्त्याच्या बाजूला उभी करायला लावली. त्यानंतर तुम्ही माझ्या गाडीला धक्का लागला आहे. त्यामुळे माझ्या गाडीचे नुकसान झाले आहे. त्याची भरपाई द्या असे धमकावले. त्यानंतर त्यांना जीवे मारण्याची धमकी देत त्यांच्या हातातील बोटात असलेल्या २ सोन्याच्या अंगठ्या व खिशातील रोकड बळजबरीने काढून घेत तेथून भरधाव वेगात निघून गेला.

फिर्यादी लामखडे यांचे बायपास ऑपरेशन झालेले असल्याने या प्रकाराने त्यांना त्रास व्हायला लागला. त्यामुळे त्यांनी नगरमधील खाजगी रुग्णालयात सर्व तपासण्या करून सायंकाळी कोतवाली पोलिस ठाण्यात येवून फिर्याद दिली. या फिर्यादी वरून पोलिसांनी अज्ञात इसमाविरुद्ध बी.एन.एस.२०२३ चे कलम ३०८ (२), १२६ (२) प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.


## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग अहमदनगर

**निविदा सुचना क्र. ६ सन २०२४-२५**

**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, अहमदनगर या कार्यालयांसाठी भाडे तत्त्वावर वाहने उपलब्ध करुन घेण्यासाठी मोहोर बंद निविदा मागविण्यात येत आहे. निविदा प्रक्रिया कार्यक्रमाच्या सर्व तारखा, सविस्तर निविदा सूचना कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण अहमदनगर यांच्या कार्यालयामध्ये दि.१७/०७/२०२४ ते २९/०७/२०२४ या कालावधीमध्ये उपलब्ध आहेत.**

**दिनांक. १७/७/२०२४**

**कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग अहमदनगर**

जिमाका/नगर/जाहि / ३३/ २०२४- २५


# प्रथमेश टवाणी सीए परीक्षेत यश



नगर - इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकौंटंट ऑफ इंडियाच्या वतीने मे २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या चार्टर्ड अकौंटंट फायनल परीक्षेत प्रथमेश टवाणी याने या परीक्षेत यश संपादन केले आहे.

प्रथमेश याला सीए ईश्वर टवाणी यांच्यासह पुणे येथील सीए सुहास बोरा, अभय बोरा, पवनकुमार दरक यांचे मार्गदर्शन लाभले. प्रथमेश हा नगरमधील सीए ईश्वर टवाणी व सौ. रूपाली टवाणी यांचा चिरंजीव आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहमदनगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेच्या लाभासाठी अर्ज करावेत

नगर - इतर मागास वर्ग, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील उच्च शिक्षण घेणाऱ्या व शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे म्हणुन ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना सुरु करण्यात आली आहे. जिल्हा तसेच तालुकास्तरावर १२ वी नंतर उच्च शिक्षण घेणाऱ्या पात्र विद्यार्थ्यांनी या योजनेच्या लाभासाठी अर्ज करण्याचे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सहायक संचालक राधाकिसन देवढे यांनी केले आहे.

योजनेच्या लाभासाठी इयत्ता १२ वीमध्ये ६० टक्के गुण आवश्यक, महाविद्यालयात प्रवेश घेतल्याचा पुरावा (कॅपलेटर) व बोनाफाईड, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा व उत्पन्नाचा दाखला, भाड्याने राहत असल्याबाबत व स्थानिक रहिवाशी नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र (नोटरी), दिलेली माहिती खरी असल्याबाबत स्वयंघोषणापत्र, कोणत्याही शासकीय वसतीगृहात प्रवेश घेतला नसल्याबाबतचे शपथपत्र, भाड्याने राहत असल्याबाबतचे भाडे चिठ्ठी, भाडे करारपत्र-करारनामा, घरमालकाचे आधारकार्ड व विद्युत देयक, विद्यार्थ्याचे आधारकार्ड, विद्यार्थी महाविद्यालयाच्या वसतीगृहात राहत असल्यास वसतीगृहाचे प्रमाणपत्र आवश्यक आहे.

या योजनेंतर्गत विद्यार्थ्याला भोजन भत्ता २८ हजार रुपये, निवास भत्ता १५ हजार रुपये, निर्वाह भत्ता ८ हजार रुपये असे एकुण ५१ हजार रुपये देण्यात येतात. एका शैक्षणिक वर्षातील १० महिन्यांच्या कालावधीसाठी लाभ अनुज्ञेय राहील. लाभाची रक्कम विद्यार्थ्यांच्या आधारसंलग्न राष्ट्रीयकृत बँक खात्यामध्ये थेट जमा केली जाते. योजनेच्या अधिक माहितीसाठी तसेच विहित नमुन्यातील अर्जासाठी सहायक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सावेडी नाका, अहमदनगर दूरध्वनी क्रमांक ०२४१-२३२९३७८ तसेच मुलांसाठी राहुल पायाळ-७३८५५७०५५० व मुलींसाठी अंजली खंडाळे ९७६७८९२१४३.

